## चिराग पासवान बिहारमध्ये सर्व जागांवर निवडणूक लढवणार

**भोजपूर, दि. ८ वृत्तसंस्था**

बिहार विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु झाली आहे. ऑक्टोबर, नोव्हेंबरला ही निवडणूक होण्याची शक्यता आहे. चिराग पासवान यांनी मोठी घोषणा केली आहे. येत्या निवडणुकीत आपला पक्ष सर्वच्या सर्व २४३ जागा लढणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. एनडीएला मजबूत करण्याच्या उद्देशाने लढणार असल्याचे ते म्हणाले. भोजपूरमध्ये एका सभेत त्यांनी ही घोषणा केली आहे. आपला पक्ष कोणत्याही प्रकारे एनडीएपासून वेगळा नाही, आपण बिहारमधील २४३ जागांवर निवडणूक लढवू. जेणेकरून एनडीए मजबूत होईल आणि आपण एकत्रितपणे विजयाकडे वाटचाल करू, असे ते म्हणाले. आपल्या पक्षाने नेहमीच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला आहे, असे ते म्हणाले.


मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

पालघर-ठाणे | रायगड - रत्नागिरी | RNI No.: MAHAMAR/2014/62313 | सोमवार, ९ जून २०२५ | वर्ष: ११ | अंक: २०० | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


अग्रलेख

## खरीखरी

### गरिबी : भ्रामक की सत्य?

आपल्या भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या कमी झाली आहे. असे आपण म्हणत नाही, तर असे जागतिक बँक म्हणते. जागतिक बँकेच्या म्हणण्यानुसार मागील १४ वर्षांमध्ये भारताने वेगाने प्रगती केलेली आहे. त्यापैकी २०११ ते २०१४ या काळात काँग्रेस प्रणित सरकारची सत्ता होती. त्यानंतरच्या काळात भाजप प्रणित सरकार आहे. २०११-१२ मध्ये देशात जवळजवळ ३५ कोटी लोक गरीबीचे जीवन जगत होते. आता त्यातून २७ कोटी नागरिक गरीबीतून बाहेर पडलेले आहेत. म्हणजे आपल्या देशाने गरीबी कमी करण्यात अशी उल्लेखनीय प्रगती केलेली आहे. त्यामध्ये उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश यासारख्या राज्यांचा समावेश आहे. बिहार हे राज्य आजारी राज्य आहे असे म्हटले जात होते. तर उत्तर प्रदेश वाढीव लोकसंख्येच्या दबावाखाली होते. अलीकडच्या काळात भारतातील या राज्यांत गरिबीमुक्त नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. ती आकडेवारी पाहता भारतातील बेरोजगारी, भारतातील कमी झालेली काम कारखानदारी याचा कोणताही परिणाम विकासावर झालेला नाही, असे म्हणावे लागेल. आपल्या देशात पंतप्रधान आवास योजना, उज्वला योजना, जनधन योजना, आयुष्यमान भारत योजना या महत्त्वाच्या उपक्रमांमुळे देशात गरिबी कमी झाल्याचे म्हणावे लागेल. या योजनांमुळे गृहनिर्माण तसेच स्वयंपाकासाठी लागणारे कच्चे इंधन, बँकिंग आणि आरोग्य सेवा यात भारताने लक्षणीय प्रगती केल्याचे दिसेल. आपल्या देशातील सर्वाधिक श्रीमंत माणूस आणि गरीब माणूस यांच्या दैनंदिन किंवा मासिक आमदनीत दहा ते पंधरा हजार पटींचा फरक आहे. म्हणजे उदाहरणार्थ अदानी, अंबानी यांचे जेवढे दररोजचे इतके उत्पन्न आहे की ते उत्पन्न एखाद्या मध्यम आकाराच्या राज्यातील सर्व गरिबांच्या उत्पन्नापेक्षा जास्त असेल. पण आता सरकारच्या विविध योजनांमुळे अनेकांना सरकारतर्फे वेगवेगळ्या योजनांच्या नावावर चांगला पैसा मिळू लागलेला आहे. हा चांगला पैसा मिळतो. म्हणून आता मजूर किंवा कामगार वर्ग अत्यंत कमी प्रमाणात कामावर जातो, असे दिसून आले आहे. खेड्यापाड्यात शेतकऱ्यांना शेतातील कामासाठी मजुरांची टंचाई जाणवते. भारतभर मोठमोठ्या गृहनिर्माण किंवा सडक निर्माण योजना सुरू आहेत. त्यात काही काम स्वयंचलित मशीनद्वारे होत असले. तरी मजुरांची टंचाई मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे. त्यामुळे उपलब्ध मजूर किंवा कामगार यांना मोठ्या प्रमाणावर मजुरी वेतन देण्यात येते, असेही दिसून आले आहे. या परिस्थितीमुळे का होईना, मजुरांना आणि कामगारांना बरे दिवस आलेले आहेत. असे जागतिक बँकेच्या आकडेवारीनुसार दिसून येत आहे. पूर्वी खेड्यापाड्यात मजुरांची मजुरी जमीनदार ठरवीत असत. आता ती मजुरी किती असावी, ते शेतीमध्ये काम करणारे मजूर ठरवतात. अमुक एवढी मजुरी दिली तरच कामावर येऊ, असा प्रकार असतो. याचे महत्त्वाचे कारण असे की आता पोट भरण्यासाठी सरकारकडून अन्नधान्य मिळते. तसेच इतर योजना सुरू आहेत. त्यामुळे मजुरी न करता ही आपण पोटभर खाऊ शकतो अशी एकूण परिस्थिती आहे. आता कामगारांना किंवा मजुरांना आपल्या मागण्या दीनवाणे होऊन मागाव्या लागत नाहीत. तर आता त्यांच्या मनाप्रमाणे मजुरी मिळते. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच पूर्वी महिनाभर काम करून जेवढी मजुरी मिळत होती. त्यापेक्षा जास्त मजुरी महिन्यातून फक्त दहा ते बारा दिवस काम केल्यावर मिळत असते. एकूणच देशाच्या आर्थिक आरोग्याच्या दृष्टीने आणि समाजवादी समाज रचनेच्या दृष्टीने ही आनंदाचीच बाब आहे. आता जमीन धारकांनीही कमीत कमी मजूर लागतील. अशा प्रकारे शेती करणे सुरू केलेले आहे. शेतीसाठी अनेक उपकरणे उपलब्ध आहेत. तीच परिस्थिती शहरातही कायम झालेली आहे. कापडाच्या गिरणीमध्ये पूर्वी जेवढे कामगार लागत असत. त्यापेक्षा १० % कामगारांमध्येही आता तितकेच काम होऊ शकते. अशीच परिस्थिती इतर अनेक उद्योगांमध्ये आहे. दहा-बारा महिला काम करून जेवढ्या पोळ्या लाटू शकतात. त्यापेक्षा चांगले आणि सफाईदार काम एक मजूर पोळ्या लाटण्याच्या मशीनद्वारे सहज करू शकतो. पोळ्याही अतिशय मुलायम बनतात. सरकारी नोकरांच्या पगारात एवढी भरमसाठ वाढ झालेली आहे की, आता सरकारलाही नव्या भरती योजना करण्याची इच्छा होत नाही. त्यापेक्षा कंत्राटी पद्धतीने सरकार ही सर्व कामे करून घेत आहे. या सर्व परिवर्तनाच्या व्यावहारिकतेमुळे प्रत्यक्षात काम करणाऱ्यांना कमी प्रमाणात का होईना. पण पूर्वीपेक्षा जास्त मजुरी मिळत असते. हे आपण अनुभवू शकतो. जागतिक बँकेने भारतातील गरिबी कमी झाल्याचे जाहीर केल्यामुळे आता सरकारला ८० कोटी लोकांना फुकट अन्नधान्य देणे गरजेचे राहणार नाही. मात्र त्यांची गरिबी नष्ट झाली असली. तरी त्यांचे मतदान गरजेचे असल्याने गरिबी रेषेच्या वर आल्यावरही या फुकट वाटपाचा कट असाच शिजत राहील. त्यामुळे आता गरिबीतून वर आलेल्या आणि कनिष्ठ मध्यमवर्गीयांमध्ये मोडणाऱ्या भारतातील कोट्यावधी लोकांचा फायदाच होईल. ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब आहे.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# ९९वे अ.भा.मराठी साहित्य संमेलन सातााऱ्यात

**पुणे, दि. ८ प्रतिनिधी**

यंदाचे ९९वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन तब्बल ३२ वर्षांनंतर साताऱ्यात भरणार आहे. आज अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या पुणे येथे झालेल्या बैठकीत एकमताने हा निर्णय घेण्यात आला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्थळ निश्चित करण्यासाठी एक स्थळ निवड समिती गठित करण्यात आली होती. या समितीने ५ ते ७ जून रोजी निमंत्रक स्थळांना भेट दिल्यानंतर आज झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या बैठकीत निवड समितीच्या निर्णयावर महामंडळाने एकमताने शिक्कामोर्तब केल्याची माहिती अध्यक्ष प्रा मिलिंद जोशी यांनी दिली.

या बैठकीला उपाध्यक्ष गुरुय्या स्वामी, कार्यवाहक सुनिता राजे पवार,कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्यासह सर्व घटक समाविष्ट आणि संलग्न संस्थांचे

### पुण्याच्या बैठकीत एकमताने निर्णय

प्रतिनिधी उपस्थित होते. भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या ९९व्या संमेलनाला आयोजित करण्याचा मान साताऱ्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाहूपुरी शाखेला आणि मावळा फाउंडेशनला मिळणार आहे .

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांनी यंदा ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्याला होणार असल्याचे सांगितले.ते म्हणाले, "साताऱ्याला ३२ वर्षांनंतर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्याचा मान मिळालाय .यापूर्वी १९९३ साली विद्याधर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली साताऱ्यात संमेलन झाले होते . गेल्या बारा वर्षांपासून महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाहूपुरी शाखा साताऱ्याला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनाची संधी मिळावी यासाठी पाठपुरावा करत होती . "

साताऱ्यात होणारे हे चौथे साहित्य संमेलन आहे. १८७८ मध्ये लोकहितवादी आणि न्यायमूर्ती रानडे यांनी ग्रंथकार संमेलन सुरू केल्यानंतर ३ मे १९०५ साली रघुनाथ पांडुकर करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली साताऱ्यात झाले होते . १९६२ मध्ये नवी गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली ४४ वे तर १९९३ साली विद्याधर गोखले यांच्या अध्यक्षतेखाली ६६वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्या आता झाले होते .

### शाहू स्टेडीअमवर होणार संमेलन

नियोजित संमेलन स्थळ छत्रपती शाहू स्टेडियम हे आहे. योगायोग असा की १९९३ साली ६६वे संमेलन इथेच झाले होते. हे स्टेडियम १४ एकरात असून तिथे मुख्य मंडप, २ इतर मंडप, ग्रंथ प्रदर्शन, कवी गझल कट्टा, तसेच भोजन व्यवस्था करण्यात येणार आहे. इतर छोटे कार्यक्रम करण्यासाठी ३ सभागृहे उपलब्ध आहेत. स्टेडियममध्ये २५,००० प्रेक्षक क्षमता असलेली गॅलरी आहे. हे स्टेडियम सातारा बस स्थानकापासून पायी चालत जाण्याच्या अंतरावर असून शहराच्या मध्यभागी असल्याने शहरातील आणि बाहेरून येणाऱ्या साहित्य रसिकांची सोय होणार आहे. स्टेडियमच्या पाठीमागील बाजूस पोलिस परेड ग्राउंडची ८ एकर जागा असून तिचा वापर पार्किंगसाठी करता येणार आहे. या संमेलनासाठी मार्गदर्शन समिती गठीत करण्यात आली असून त्यात प्रा मिलिंद जोशी, गुरय्या स्वामी, सुनिता राजे पवार, विनोद कुलकर्णी, प्रदीप दाते, दादा गोरे आणि डॉ उज्ज्वला मेहेंदळे यांचा समावेश आहे.

# कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन पक्ष निर्णय घेईल- सुप्रिया सुळे

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवार आणि अजित पवार एकत्र येणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहेत. या चर्चांचं कारण म्हणजे मागील काही दिवसांत अनेकवेळा शरद पवार आणि अजित पवार एकाच व्यासपीठावर आल्याचं पाहायला मिळालं. एवढंच नाही तर त्यांच्यात अनेकदा संवाद झाल्याचंही पाहायला मिळालं. काही दिवसांपूर्वी शरद पवार आणि अजित पवार हे पुण्यातील साखर संकुलातील बैठकीत देखील एकत्र आल्याचे पाहायला मिळाले होतं. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? अशा चर्चांनी आणखी जोर धरला आहे.

यातच आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार अमोल मिटकरी यांनी एक सूचक भाष्य केले. पांडुरंगाची इच्छा असेल तर बहीण-भाऊ आषाढी एकादशीपर्यंत एकत्र येऊ शकतात, असे अमोल मिटकरी यांनी म्हटले. त्यानंतर आता खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? यावर मोठं भाष्य केलं आहे. 'हा माझा निर्णय नाही, जो पक्षाचा निर्णय असेल तो निर्णय पक्षाच्या शेवटच्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन आणि त्याच्या मनात जे असेल तोच निर्णय पक्ष घेईल', असं सूचक भाष्य सुप्रिया सुळे यांनी केलं.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चा आहेत. त्याबाबत तुमची भूमिका काय आहे? असा प्रश्न माध्यमांच्या प्रतिनिधींनी खासदार सुप्रिया सुळे यांना विचारला. यावर सुप्रिया सुळे म्हणाल्या की, "हा माझा निर्णय नाही, मी आता कुठे जाणार, इंदापूरला आधी जाणार की दौंडला आधी जाणार. त्यामुळे हा पक्षाचा निर्णय आहे. कुठल्याही सशक्त लोकशाहीमध्ये आणि त्यातच शरद पवार यांच्या कामांची पद्धत तुम्ही सर्वांनी सहा दशकं पाहिलेली आहे. शरद पवार जो काही निर्णय घेतात किंवा जे काही मार्गदर्शन करतात ते लोकशाही पद्धतीनेच होतं. त्यामुळे जो पक्षाचा निर्णय असेल तो निर्णय पक्षाच्या शेवटच्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन आणि त्याच्या मनात जे असेल तोच निर्णय पक्ष घेईल. आम्ही कोणताही निर्णय वैयक्तिक घेत नाहीत", असं सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या चर्चांवर बोलताना अमोल मिटकरी यांनी मोठे विधान केले. ते म्हणाले की, "पांडुरंगाची इच्छा असेल तर बहीण भाऊ आषाढी एकादशीपर्यंत एकत्र येऊ शकतात", असे अमोल मिटकरी यांनी म्हटलं. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळाच चर्चांना उधाण आलं आहे.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? भविष्यात काही वेगळे चित्र दिसेल का? असं काही दिवसांपूर्वी अजित पवार यांना विचारले असता ते म्हणाले होते की, "माझ्या मुलाच्या साखरपुड्याला ते सर्वजण (शरद पवार, सुप्रिया सुळे) आले होते. घरातील कार्यक्रम असतील तर आम्ही जातोच, एकत्र येतोच. आमची विचारधारा वेगवेगळी जरी असली तरी बाकीच्या बाबतीत कुटुंब म्हणून जिथे कुठे सुख आणि दु:खामध्ये आपण नेहमी एकमेकांच्या बरोबर असतो", असे अजित पवार यांनी म्हटले होते.

# नितेश राणेंना धाराशिवमध्ये घर बांधून द्या - खासदार ओमराजे निंबाळकर

**धाराशिव, दि. ८ प्रतिनिधी**



धाराशिव जिल्हा नियोजन समितीच्या निधीवाटपावरून भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यात सध्या वादाची ठिणगी उडाली आहे. भाजपचे आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांनी केलेल्या तक्रारीनंतर समितीच्या कामांवर स्थगिती देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री नितेश राणे यांनी धाराशिव येथील भाजपच्या मेळाव्यात बोलताना म्हटले की, "कोणी कितीही ताकद दाखवली, कोणी कसेही नाचले, तरी देशात नरेंद्र मोदी हेच पंतप्रधान राहतील आणि राज्यात देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री आहेत. लक्षात ठेवा, सगळ्यांचा बाप म्हणून मुख्यमंत्रीपदावर भाजपचाच नेता बसलेला आहे," असे वक्तव्य केले. आता नितेश राणे यांच्या वक्तव्यावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी जोरदार हल्लाबोल केलाय.

खासदार ओमराजे निंबाळकर म्हणाले की, विकास निधी म्हणजे कणकवलीची वडिलोपार्जित प्रॉपर्टी नाही. सत्तेची मस्ती त्यांच्या डोक्यात गेली आहे, जनता ही मस्ती उतरवण्याचं काम करेल. भाजपला आता राष्ट्र प्रथम या विचाराचा विसर पडला आहे. आमच्या सोबत आले तरच निधी हा लोकशाहीचा खून असून अशा वृत्तीला ठेचायला हवं, असा हल्लाबोल त्यांनी नितेश राणे यांच्यावर केला आहे.

जनता ही सगळ्यांचा बाप असते त्याचा विसर पडू नये, जनता तुम्हाला धडा शिकवेल. नितेश राणेंना धाराशिवमध्ये घर बांधून द्या. त्यांना जाण्या-येण्याचा त्रास नको, जनतेचे प्रश्न त्यांना किरकिर वाटत असेल तर ते आम्ही करणारच आहोत, अशी टीका देखील ओमराजे निंबाळकर यांनी नितेश राणे यांच्यावर केली आहे. आता ओमराजे निंबाळकर यांच्या टीकेला नितेश राणे काय प्रत्युत्तर देणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### निलेश राणेंचीही नाराजी

दरम्यान, नितेश राणे यांच्या वक्तव्यावर त्यांचे बंधू निलेश राणे यांनीही नाराजी व्यक्त केली आहे. सोशल मीडियावर प्रतिक्रिया देत निलेश राणे यांनी म्हटले आहे की, "नितेशने बोलताना जपून बोलायला हवे. मी त्याला भेटल्यावर याबद्दल नक्कीच बोलेन. मात्र सार्वजनिकरित्या बोलताना प्रत्येक गोष्टीचं भान ठेवायला हवं. सभेत बोलणं सोपं असतं, पण आपल्या बोलण्यामुळे नेमका कोणाचा फायदा होतोय, हे समजून घेणं आवश्यक आहे. आपण महायुतीचा भाग आहोत, हे विसरून चालणार नाही. "

# देशात करोना संक्रमणाचा वेग भयावह

## सर्वाधिक मृत्यू महाराष्ट्रात

**नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था**

देशात करोनाने पुन्हा एकदा पाय पसरू लागला आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार, शनिवारपर्यंत भारतातील करोना रुग्णांची संख्या वाढून ६००० चा आकडा पार केला आहे. "केरळमध्ये परिस्थिती गंभीर आहे," असे मंत्रालयाने म्हटले आहे. देशात गेल्या २४ तासांत ३९१ सक्रिय रुग्णांची वाढ झाली आहे. महाराष्ट्र हा सर्वाधिक रुग्णसंख्येच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. गेल्या २४ तासांत देशात ४ लोकांचा मृत्यू झाला आहे. जानेवारीपासून आतापर्यंत करोनामुळे ५९ लोकांचा जीव गेला आहे. महाराष्ट्रात १८ रुग्णांचा मृत्यू झाला. यापैकी १७ जणांना इतर आजार होते. त्यामुळे महाराष्ट्र हे सर्वाधिक मृत्यू असलेले राज्य ठरले आहे. केरळमध्येही कोविडमुळे १२ रुग्णांनी आपला जीव गमावला. दिल्लीत ७ लोकांचा मृत्यू झाला आहे. गुजरातमध्ये २ लोकांचा मृत्यू झाला. कर्नाटकात ९ लोकांचा मृत्यू झाला आहे. पंजाबमध्ये २ आणि राजस्थानमध्ये १ मृत्यू झाला आहे. उत्तर प्रदेशात २ आणि बंगालमध्ये १ मृत्यू झाला आहे.

# निवडणुकीनंतर किरण कुलकर्णींची बदली का केली, त्यांची नार्को टेस्ट करा; फडणवीसांच्या लेखावर काँग्रेसची मागणी

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**


काँग्रेस नेते आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी लेख लिहून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांच्या निकालावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. निवडणूक आयोगाला संशयाच्या भोवऱ्यात ठेवत आगामी बिहार निवडणुकांमध्येही अशाच प्रकारे कामकाज होईल, असा दावाही त्यांनी केला होता. आता, राहुल गांधींच्या लेखाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जशास तसे उत्तर दिलं आहे. विशेष म्हणजे, ज्या 3 वृत्तपत्रांत राहुल गांधींचे लेख छापून आले, त्याच ३ वृत्तपत्रांत फडणवीसांचेही लेख छापून आले आहेत. विधानसभा निकाल, वाढीव मतदान आणि निवडणूक आयोगावरुन दोन्ही नेते भिडल्याचं दिसून येत आहे. आता, देवेंद्र फडणवीसांच्या लेखावरुन महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पलटवार केला आहे. तसेच, किरण कुलकर्णी यांची निवडणुका संपल्या की मराठी भाषा विभागात बदली केली. जेणेकरून कोणतीच बाब उघडकीस येऊ नये, असा गंभीर आरोपही हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

राहुल गांधी यांनी काल काही प्रश्न उपस्थित केले होते, भाजपवर त्यात थेट आरोप नव्हता. लोकशाही वाचण्याच्या दृष्टीने वस्तुनिष्ठ प्रश्न उपस्थित केले. निवडणूक झाल्यापासून राहुल गांधी सदर मुद्द्याचा पाठपुरावा करत आहेत. निवडणूक आयोगाने यावर उत्तर देणं अपेक्षित आहेत. मात्र, याची उत्तरं देवेंद्र फडणवीस अणि अमित शाह देत आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी आज लेख लिहिला आहे. गोंधळलेल्या परिस्थिती हा लेख लिहिला आहे. तुम्हीच आरोपी आहात आणि तुम्हीच लेख लिहित आहात. त्यामधे तुमच्यासोबत केंद्रीय यंत्रणा आणि तुमचा पक्ष देखील आहे. रामशास्त्री प्रभुणे यांच्या बाण्यात असल्याचा आविर्भाव आणला. मात्र, त्यांचा कारभार घाशीराम कोतवाल सारखा आहे, अशा शब्दात हर्षवर्धन सपकाळ यांनी फडणवीसांवर पलटवार केला आहे.

किरण कुलकर्णी नावाचे अधिकारी निवडणूक आयोगात काम करत होते. एस. चोकलिंगम यांच्यानंतर ते काम करत होते. वाढलेल्या मतदानाबाबत त्यांना सगळी माहिती आहे, निवडणुका संपल्या की मराठी भाषा विभागात त्यांची बदली केली. जेणेकरून कोणतीच बाब उघडकीस येऊ नये, असा गंभीर आरोप देखील हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. तसेच, तत्काळ किरण कुलकर्णी या अधिकाऱ्याची नार्को टेस्ट करा, अशी आमची मागणी असल्याचेही सपकाळ यांनी म्हटले. आम्ही २०० मतदारसंघाचा डेटा समोर ठेवला आहे. केवळ ते दोन तीन मतदारसंघाचं उदाहरण देता. मग आमची मागणी आहे, त्यावेळीचे सीसीटीव्ही समोर आणा. त्याठिकाणी असणारे मदरबोर्ड तपासा आणि किरण कुलकर्णी यांची तत्काळ नार्को टेस्ट करा, असेही सपकाळ म्हणाले.

# अखंड शिवसेना: कीर्तिकरांचे मत वैयक्तिक - रामदास कदम

**रत्नागिरी, दि. ८ प्रतिनिधी**



शिवसेनेचे माजी खासदार गजानन कीर्तिकर यांनी उद्धव ठाकरे, राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी एकत्र येत अखंड शिवसेना उभी करण्याचा विचार करावा, असं म्हटले होते. याशिवाय गजानन कीर्तिकर हे एकनाथ शिंदेंची शिवसेना भाजपप्रणित, उद्धव ठाकरेंची शिवसेना काँग्रेसप्रणित असल्याचे म्हटले होते. आता बाळासाहेब ठाकरेंच्या विचाराने पुढे जाणारी शिवसेना हवी आहे, असे गजानन कीर्तिकर म्हणाले होते. कीर्तिकर यांच्या या वक्तव्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री रामदास कदम यांनी प्रतिक्रिया दिली आहे. गजानन कीर्तिकरांचं मत वैयक्तिक असून त्यांची भूमिका पक्षाची नाही, असं कदम म्हणाले.

गजानन कीर्तिकर साहेब जे बोलले ते त्यांचे वैयक्तिक मत आहे, पक्षाचे मत नाही. मला त्यांनी फोन केला होता,माझे त्यांच्याशी बोलणे झाले आहे. कीर्तिकर यांचा विषय होता तो वैयक्तिक होता, त्यांची भूमिका पक्षाची नाही, असे रामदास कदम म्हणाले.

उद्धव ठाकरेंकडे फक्त हम दोने और हमारे तीन एवढेच शिल्लक राहणार हे अनेकदा बोललो आहे. शिवसेना नाव आमच्याकडे आहे शिवसेनेचा चिन्ह आमच्याकडे आहे. ठाकरे ब्रँड आता आमच्याकडे आहे, असे रामदास कदम म्हणाले. उद्धव ठाकरेंनी काँग्रेससोबत सोयरिक केली त्यांच्याकडे ठाकरे ब्रँड कसा असू शकतो असा सवाल रामदास कदम यांनी केला. वरळीत आदित्य ठाकरे उभे असताना मनसेने मदत केली आणि आदित्य ठाकरेंना निवडून आणले. मात्र, राज ठाकरे यांचा मुलगा अमित ठाकरे ज्या वेळेला उभा राहिला त्यावेळी त्यांच्यासमोर उद्धव ठाकरे यांनी उमेदवार दिला आणि त्याला पराभूत केले. ही गोष्ट राज ठाकरे विसरले नसतील. मनसेचे ७ नगरसेवक होते त्यापैकी ६ नगरसवेक घेतले हे उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेत घेतले ही गोष्ट राज ठाकरे विसरले नसतील. उद्धव ठाकरे संधीसाधू आहेत, असा हल्लाबोल देखील रामदास कदम यांनी केला आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या प्रश्नावर रामदास कदम यांनी आता दोन्ही पवार एकत्र नाहीत असे तुम्हाला म्हणायचे आहे का ? माझ्या त्यांना शुभेच्छा आहेत. शरद पवार हे देशातील ज्येष्ठ नेते आहेत. त्यांनी अनेक उन्हाळे पावसाळे पाहिलेले आहेत. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येत असेल तर माझ्या त्यांना शुभेच्छा आहेत, असं रामदास कदम म्हणाले.

# ९ वर्षांच्या मुलीची बलात्कार करून हत्या

**नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था**



ईदच्या दिवशी दयालपूरमधील एका कुटुंबाचा आनंद शोकात बदलला जिथे ९ वर्षांची मुलगी सुटकेसमध्ये बंद आढळली. तिला रक्ताने माखलेल्या अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. मुलीवर बलात्कार करण्यात आला आणि नंतर तिची हत्या करण्यात आली. तिच्या चेहऱ्यावर जखमांच्या खुणा आहेत. ईशान्य जिल्हा डीसीपी आशिष मिश्रा म्हणाले की, वैद्यकीय तपासणीत मुलीवर बलात्कार झाल्याचे पुष्टी झाली आहे. तिच्या चेहऱ्यावर जखमांच्या खुणा आहेत. सुरुवातीच्या तपासात असा संशय आहे की मुलीवर बलात्कार करून नंतर तिची हत्या करण्यात आली. नंतर तिचा मृतदेह विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने सूटकेसमध्ये बंद करण्यात आला.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, नेहरू विहार दयालपूर परिसरात राहणाऱ्या ९ वर्षांच्या मुलीच्या कुटुंबात पालक आणि इतर कुटुंबातील सदस्यांचा समावेश आहे. मुलीच्या वडिलांनी सांगितले की संध्याकाळी ती तिच्या मोठ्या आईकडे बर्फ घेण्यासाठी गेली होती. बराच वेळ ती परत आली नाही तेव्हा त्यांनी चौकशी केली, तेव्हा कुटुंबातील सदस्यांनी सांगितले की मुलगी तिथे पोहोचली नाही. यानंतर मुलीचा शोध सुरू करण्यात आला.

दरम्यान, कोणीतरी सांगितले की त्यांनी मुलीला या घरात जाताना पाहिले. तिचे वडील घरात गेले तेव्हा गेट बंद होते. त्यांनी दार उघडले आणि पाहिले की तिथे एक सुटकेस होती. त्यांनी लगेच ती उघडली तर मुलगी रक्ताने माखलेली आढळली. कुटुंबीयांनी तिला ताबडतोब एका खाजगी रुग्णालयात नेले, तेथून मुलीला दुसऱ्या रुग्णालयात पाठवण्यात आले. जिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. वैद्यकीय तपासणीत मुलीवर बलात्कार झाल्याचे पुष्टी झाली आहे.

# गॅस टँकरची मिनीबसला भीषण धडक, ३० प्रवासी जखमी

**रत्नागिरी , दि. ८ प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील निवळी येथे आज (रविवार) सकाळच्या सुमारास गॅस टँकरने मिनीबसला पाठीमागून जोरदार धडक दिली. यामध्ये मिनीबस चालकाचे नियंत्रण सूटल्यामुळे बस खोल दरीत कोसळून मिनीबसमधील 30 प्रवासी जखमी झाले. त्यातील एक गंभीर जखमी आहे.

अपघातातील जखमींवर जिल्हा शासकिय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, गॅस टँकरमधील गॅस लिक होउन आजुबाजुच्या दोन घरांना लाग लागली असून, त्यात एक म्हैस होरपळली आहे. त्या ठिकाणी अग्निशमन दल आणि ग्रामीण पोलिस दाखल झाले असून परिस्थितीत नियंत्रणात आणण्याचे काम युध्द पातळीवर सूरु आहे.



# चंद्रहार पाटलांचा ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र

**सांगली, दि. ८ प्रतिनिधी**

डबल महाराष्ट्र केसरी पैलवान चंद्रहार पाटील यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. चंद्रहार पाटील यांनी सोशल मीडिया पोस्ट करुन या निर्णयाची माहिती दिली आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी चंद्रहार पाटील यांनी ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. चंद्रहार पाटील यांनी सांगली लोकसभा मतदारसंघातून उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून निवडणूक लढवली होती, त्यामध्ये त्यांचा पराभव झाला होता. आता चंद्रहार पाटील यांनी सरकारसोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजेच लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर बरोबर एक वर्षानं चंद्रहार पाटील यांनी ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र केला आहे.



राज्यातील क्रीडा क्षेत्रामध्ये काम करत असताना, बऱ्याच त्रुटी, अडचणी, गैरप्रकार मी अनुभवलेले आहेत. अशा बाबींविरुद्ध मी वेळोवेळी आवाज देखील उठवला आहे. परंतु, प्रत्यक्ष शासन सहभागाशिवाय असे प्रश्न मार्गी लागणे कठीण आहे. म्हणून क्रीडा क्षेत्रामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करण्यासाठी, मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी सरकार सोबत जाण्याचा निर्णय घेतलेला आहे, असं चंद्रहार पाटील म्हणाले. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून चंद्रहार पाटील आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नेत्यांच्या भेटीगाठी वाढल्या होत्या. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या माध्यमातून चंद्रहार पाटील यांनी एकनाथ शिंदेंची भेट घेतली होती.

# सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल जाहीर

## राज्यस्तरीय स्पर्धेत 'हंस', तर जिल्हास्तरीयमध्ये 'इंद्रधनु' ठरले सर्वोत्कृष्ट



पनवेल: विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या २४ व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल जाहीर झाला आहे. एक लाख रुपये व सन्मानचिन्ह असलेला सर्वोत्कृष्ट राज्यस्तरीय दिवाळी अंकाचा पुरस्कार 'हंस' अंकासाठी देण्यात येणार आहे, तर रायगड जिल्ह्यास्तरीय प्रथम पारितोषिक इंद्रधनु अंकाने पटकाविला असून चाळीस हजार रुपये आणि सन्मानचिन्हाने त्यांना गौरविण्यात येणार आहे. दिवाळी अंक महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कतिक परंपरा आहे. ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निमिर्ती व्हावी यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेले श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ तसेच मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या वेळची ही २४ वी स्पर्धा आहे. राज्यभरातून उदंड प्रतिसाद लाभलेल्या या स्पर्धेसाठी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. अविनाश कोल्हे, महाराष्ट्र सेवा संघ मुलुंडचे कार्यवाह अरूण भंडारे आणि सुप्रसिद्ध सुलेखनकार सुनील धोपावकर यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी बजावली. स्पर्धेचे मुख्य समन्वयक म्हणून मुंबई मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष शैलेंद्र शिर्के यांनी, तर रायगड जिल्ह्यातील स्पर्धेचे समन्वयक म्हणून संघाचे ज्येष्ठ सदस्य दीपक म्हात्रे यांनी काम पाहिले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत होईल, असे पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी कळविले आहे.

राज्यस्तरीय निकाल :
सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक-हंस, द्वितीय पारितोषिक-अंतरीचे प्रतिबिंब, तृतीय पारितोषिक-अक्षर, सर्वोत्कृष्ट विशेषांक-नवभारत, दृश्य कला विशेषांक; मुलांसाठी सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक-वयम, उत्तेजनार्थ-छावा, उत्कृष्ट दिवाळी अंक-कालनिर्णय, सर्वोत्कृष्ट कथा-सत्याग्रह, मिलिंद बोकील (दीपावली), उत्कृष्ट कविता-आजकाल बायकाही..., लक्ष्मी यादव, पुरुष स्पंदन (७६); लक्षवेधी परिसंवाद-असहमतीचा आवाज, ऋतूरंग; लक्षवेधी मुलाखत-डॉ. सुनील लवटे, शब्दशिवार, इंदूमती गोंधळे; सर्वोत्कृष्ट मुखपृष्ठ-उत्तम अनुवाद, सर्वोत्कृष्ट व्यंगचित्रकार-प्रभाकर वाईरकर, शब्द रूची; सर्वोत्कृष्ट डिजिटल अंक-विवेक मेहेत्रे, 'उद्वेली-ऑल दि बेस्ट 2024'; विशेष लेख-राजकारण की टोळीयुद्ध, आर्याबाग, विनय हर्डीकर.

रायगड जिल्हास्तरीय निकाल:
सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक-इंद्रधनु, द्वितीय पारितोषिक-आगरी दर्पण, तृतीय पारितोषिक-शब्दसंवाद, उत्तेजनार्थ-लोकसेवक, साहित्य आभा, उत्कृष्ट कथा-रेखा नाबर, लोकसेवक, जिथे कमी तिथे मी; उत्कृष्ट कविता-हितवर्धक, कवी गणपत म्हात्रे, उत्कृष्ट व्यंगचित्रकार-विवेक मेहेत्रे, साहित्य आभा.

# वीर वाजेकर महाविद्यालयातर्फे पर्यावरण दिनानिमित्त विविध ठिकाणी वृक्षारोपण संपन्न



उरण: येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, महालण विभाग, फुंडे यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या (NCC) वतीने उरण तालुक्यात विविध ठिकाणी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण करण्यात आले. "प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करा" (Beat Plastic Pollution) या 2025 च्या जागतिक पर्यावरण दिनाच्या घोषवाक्याला अनुसरून, पर्यावरण रक्षण आणि प्लास्टिकविरहित जीवनशैलीसाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत दिघोडे येथील महात्मा गांधी विद्यालय, बापूजी देव मंदिर परिसर, खारपाटील महाविद्यालय चिरनेर आणि रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील हायस्कूल पिरकोन या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणासोबतच चिरनेर येथील बापूजी देव देवराई परिसरात स्वच्छता मोहिमाही राबविण्यात आली. या कार्यक्रमास वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, उपप्राचार्य गजानन चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. राम गोसावी, राष्ट्रीय छात्र सेनेचे विभाग प्रमुख डॉ. राजकुमार कांबळे, यांच्यासह राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि स्वयंसेविका उपस्थित होते. महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री फल्ले सर, चिरनेर येथील खारपाटील हायस्कूलचे प्राचार्य पट्टेबहादूर सर, पिरकोन येथील शाळा व्यवस्थापन समितीचे प्रमुख श्री जीवन गावंड, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी निकेतन रमेश ठाकूर तसेच फ्रेंड्स ऑफ नेचर (FON) चिरनेर संस्थेचे श्री दिनेश चिरनेरकर हेही विविध ठिकाणी संपन्न झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी झाले होते. महाविद्यालयाच्या वतीने चिंच, कडुलिंब, आवळा, पिंपळ आणि करंज अशी विविध प्रकारची सुमारे 100 झाडे व काळी मिरी, वेलदोडे, दालचिनी, तेज पत्ता, कळी हळद, अडुळसा इत्यादी औषधी झाडे पण लावण्यात आली.

# फरार आरोपी चैतन्य शिंदे अखेर जेरबंद

## रोहा पोलिसांची शिताफीने कामगिरी; वन्यजीव संवर्धन संस्थेचे सहकार्य



रोहा: कल्याण तालुका पोलिस दाखल गुन्हा रजिस्टर नंबर 636/2024 BNS 137 (2) अन्वये फरार झालेल्या आरोपी चैतन्य राजू शिंदे (वय २३, रा. रोहीदास नगर, रोहा) याला आज रोहा पोलिसांनी शिताफीने पाठलाग करून अष्टमी परिसरातून ताब्यात घेतले. सदर आरोपी याने ४ जून रोजी न्यायालयीन कोठडी मंजूर झाल्यानंतर पोलिसांना झटका देत कल्याण रेल्वे स्थानकातून पळ काढला होता. आज बकरी ईद निमित्त पोलिस गस्तीदरम्यान, गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार चैतन्य शिंदे रोहा रेल्वे स्थानक परिसरात असल्याचे कळताच पोलिसांनी तातडीने पथक तयार करून परिसराचा ताबा घेतला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने पळण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलीस निरीक्षक मारुती पाटील, पोलिस आणि इतर कर्मचारी यांच्या मदतीने पाठलाग करून अष्टमी शहर परिसरातून त्यास ताब्यात घेण्यात आले. या संपूर्ण कारवाईत रोहा पोलीस ठाण्याचे पेडवी, शीरतार, गुट्टे, पाटील, तडवी, कोटकर, बिजले, भोईर, साळुंखे तसेच मुख्यालयाकडील स्ट्रेकिंग फोर्स, वन्यजीव संवर्धन संस्थेचे टीम व अष्टमी भागातील ग्रामस्थांचा मोलाचा सहभाग होता. विशेष म्हणजे, या कारवाईत विशेष निसर्ग वन्यजीव संवर्धन संस्था यांनीही महत्त्वाची मदत केली. सदर माहिती कल्याण तालुका पोलिस ठाण्याला देण्यात आली असून, तिकडून आलेली टीम आरोपीचा ताबा घेण्यासाठी निघाली आहे.

# सख्ख्या बापानेच रागाच्याभरात 1 वर्षाच्या मुलीला फरशीवर आपटून ठार मारले



पेण: सख्ख्या बापानेच रागाच्याभरात आपल्या १ वर्षाच्या मुलीला फरशीवर आपटून ठार मारल्याची संतापजनक घटना पेण तालुक्यात घडली आहे. या माथेफिरू बापाला वडखळ पोलिसांनी अटक करुन त्याची रवानगी अलिबाग येथील कारागृहात करण्यात आली आहे. पेण तालुक्यातील पाबळ येथील देवमाळ ठाकूरवाडी येथे सुरेश पद्मा दोरे (वय ४० वर्षे ) हा रहात होता. तो रागीट स्वभावाचा असल्याने त्याचे कोणाबरोबर पटत नव्हते. मजुरीचे अत्यल्प उत्पन्न व दारूचे व्यसन तसेच पत्नींना करीत असलेल्या मारहाणीमुळे सुरेशला त्याच्या दोन बायका सोडून गेल्या होत्या. त्याची तिसरी बायकोही याच कारणामुळे दिड महिन्यापूर्वी त्याला सोडून गेली होती. या तिन्ही बायकांकडून त्याला एकूण चार मुले होती. पहिला मोठा मुलगा ५ वर्षाचा तर दुसरा मुलगा ४ वर्षाचा आहे. तिसरी मुलगी ३ वर्षाची आहे व चौथी सर्वात लहान मुलगी विजया १ वर्षाची होती. सोडून गेलेल्या बायका, दारूचे व्यसन व चार मुलांची जबाबदारी यामुळे तणावात असलेल्या सुरेशने रागाच्या भरात १ जुन रोजी आपल्या एक वर्षाच्या विजया उर्फ बेबीला फरशीवर आपटून तिला ठार मारले. सदर घटनेबाबत माहिती मिळताच वडखळ पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांनी त्वरित पोलिसांचे पथक पाठवून सुरेश दोरे याला अटक केली. या बाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महात्मा एज्युकेशन अँड पब्लिक स्कूल मध्ये पत्रकार साबीर शेख यांचा जन्मदिन अभिष्टचिंतन



पनवेल: श्री.के व्ही एस फाउंडेशन महात्मा एज्युकेशन अँड पब्लिक स्कूल तर्फे गरीब, गरजू विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी उपलब्ध होत असून निःशुल्क शिक्षण मिळावे या उद्देशाने संस्थेच्या अटी, शर्तीचे पालन करणाऱ्या विद्यार्थ्यांना या सवलतीचा लाभ दिला जातो . संस्थापक अध्यक्ष डॉ. प्राध्यापक क्रिष्णा कुमार यांच्या मोफत शिक्षण अभियानात पत्रकार साबीर शेख यांची साथ त्यांना अनेक विद्यार्थ्यांच्या पालकां पर्यंत पोचवत असते ,शेख संस्थेच्या सल्लागार कमिटीचे सदस्य असल्याने दि.०६ जून हा साबीर शेख यांचा जन्मदिन अभिष्टचिंतन संस्थेच्या सभागृहात शिक्षक, पालक,विद्यार्थी वर्ग तसेच संस्था सदस्य, स्वयंसेवी संस्था अश्या मान्यवरांच्या उपस्थितीत केक कापून साजरा करण्यात आला. मोफत शिक्षण व रोजगार देण्याच्या उद्देशातुंन शिक्षक व पत्रकार मिळाल्या नंतर समाजात शिक्षणाची अशी क्रांती घडते असे डॉ. क्रिष्णा कुमार व साबीर शेख यांच्या मैत्रीचे उदाहरण आहे असे गौरव उदगार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांनी काढले, साबीर शेख यांची मैत्री व साथ ज्यांना पण मिळाली त्यांनी त्याच त्यांनी नेहमी सोन केलं आज त्यांचा आपण जन्मदिन साजरा करतोय यासाठी मला आमंत्रित केल्या बद्दल डॉ.क्रिष्णा कुमार यांचे आभार मानले. यावेळी पाहुण्यात उद्योजक पराग म्हात्रे, प्रवीण शेंडे,पत्रकार प्रेरणा गावंड,राजन शेलार, शबनम शेख,सुनील कटेकर, शफीक भट्टी आदी मान्यवर शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.

# महिला सक्षमीकरणासाठी शिवणयंत्र वाटप; श्री व्हिजनस् आणि डिजिटल स्किल्स यांचा उपक्रम

पेण: श्री व्हिजनस् आणि डिजिटल स्किल्स यांच्या संयुक्त सहकार्याने "महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत शिवणयंत्र वाटप" हा कार्यक्रम उत्साहात व प्रेरणादायी महिलांना विशेष प्रेरणा लाभली. त्यांनी महिलांना शुभेच्छा देताना सांगितले की, "स्वावलंबनासाठी असे उपक्रम अत्यंत गरजेचे आहेत."



वातावरणात पार पडला. या उपक्रमाअंतर्गत महिला बचत गटांतील महिलांना शिवणयंत्र आणि प्रशिक्षणानंतरचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. याकार्यक्रमास .आ. महेंद्र दळवी यांच्या वतीने कन्या जुईली दळवी तसेच सौ. संजीवनी नाईक याही विशेष उपस्थित होत्या. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमात डिजिटल स्किल्स संस्थेच्या प्रमुख सौ. सोनल हर्षल कदम, श्री व्हिजनचे विशाल घरत, तसेच पर्यावरण फाउंडेशन आणि अवनी हेल्पो फाउंडेशनचे प्रतिनिधी, स्थानिक पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, महिला बचत गटांच्या प्रमुख व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# 'द सायकल सभा' पनवेल महानगरपालिकेच्या अभिनव उपक्रम संपन्न



पनवेल: पनवेल महानगरपालिकेच्यावतीने गुरूवारी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली माझी वसुंधरा अभियान व पर्यावरणदिनानिमित्त 'द सायकल सभा' हा नाविन्यपूर्ण अभिनव उपक्रम आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आला.यावेळी 'पर्यावरणाच्या दृष्टीने सायकलचे महत्व' या विषयावर आधारित विशेष चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले. तसेच सायकलिंगच्या विविध प्रतिनिधींना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, पर्यावरण विभाग प्रमुख प्रफुल घरत, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सायकलचा वापर हा आरोग्यदायी जीवनशैलीसाठी महत्वपूर्ण आहे. याबरोबर पर्यावरणपूरक वाहतुकीचा एक प्रभावी पर्याय आहे, ज्यामुळे प्रदूषणही कमी होते व गर्दी कमी होते. हा संदेश नागरिकांना देण्यासाठी माझी वसुंधरा उपक्रमांतर्गत उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्यावतीने सायकल रॅलींचे आयोजन करण्यात येत असते. या कार्यक्रमात महापालिका कार्यक्षेत्रातील सुमारे दहाहून अधिक सायकलिंगच्या विविध गटांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पर्यावरण संरक्षण, शाश्वत जीवनशैली व हरित वाहतूक यावर माहितीपूर्ण चर्चा यावेळी करण्यात आली. तसेच यावेळी उपस्थित सायकलिंगच्या विविध गटांच्या प्रतिनिधींना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. पर्यावरणाच्या दृष्टीने सायकल चालवल्यामुळे होणारे फायदे

1.संपूर्ण शरीराचा व्यायाम होतो. हृदय मजबूत होते, रक्ताभिसरण सुधारते, स्नायू ताठर व मजबूत होतात. त्यामुळे फिटनेस राखण्यासाठी सायकलिंग खूप उपयुक्त आहे.
2.मानसिक तणाव कमी होतो. सायकल चालवताना मेंदूला ऑक्सिजन मिळतो, नैसर्गिक वातावरणात मन प्रसन्न राहतं. यामुळे तणाव, चिंता व नैराश्य कमी होण्यास मदत होते.
3.इंधनाची बचत होते. सायकल चालवताना पेट्रोल किंवा डिझेल यांचा उपयोग लागत नाही. त्यामुळे इंधनाची बचत होते आणि परावलंबित्व कमी होते.
4.पर्यावरण रक्षण होते. सायकल चालवल्यामुळे प्रदूषण होत नाही. यामुळे हवामान स्वच्छ राहते आणि कार्बन उत्सर्जन कमी होते. ही एक पर्यावरणपूरक वाहतूक पद्धत आहे.
5.पैशांची बचत होते. इंधन, पार्किंग फी, वाहनाची देखभाल या गोष्टींवरचा खर्च सायकलमुळे वाचतो. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सायकल चालवणे फायदेशीर आहे.

# राष्ट्रीय महामार्ग ते खैरासवाडी व निफाडवाडी हा पूर्वापार वडिलोपार्जित रस्ता सुरु ठेवा

## आदिवासी शेतकऱ्याची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक



पेण: तालुक्यातील दुष्मी, खैरासवाडी खरोशी जिते येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी व स्थानिक आदिवासी बांधवांनी राष्ट्रीय महामार्ग ते खैरासवाडी निफाडवाडी या रस्त्यासाठी तसेच दोन दिवसांपूर्वी एका व्यक्तीने स्वतःच्या स्वार्थासाठी पत्रकार परिषद घेऊन कॉरी क्रशर संदर्भात प्रशासनाला खोटी माहिती देऊन शासनाची दिशाभूल केली आहे या संदर्भात वस्तुस्थिती दर्शक माहिती व खुलासा व्हावा यासाठी जिल्हा वनविभाग कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयाला भेट दिली. सदर एका व्यक्तीने दिलेली माहिती खोटी असून दुष्मी व खरोशी हद्दीमध्ये वनविभागाच्या व आदिवासींच्या जमिनीमध्ये कोणतेही प्रकारचे बेकायदेशीर उत्खनन झालेले नसून उलट स्वतःच्या मालकीच्या जागेतून शासनाची पूर्वपरवानगी घेऊन उत्खनन सुरू आहे. या उत्खननापासून कोणत्याही आदिवासी तसेच इतर नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास नाही.तसे कोणत्याही स्थानिक आदिवासींनी किंवा ग्रामस्थांनी कोणतीही तक्रार शासनाकडे दाखल केलेली नाही. त्याचप्रमाणे राष्ट्रीय महामार्ग ते खैरासवाडी निफाड वाडी हा पूर्वापार वहिवाटीच्या जागेतून वडिलोपार्जित जुना अस्तित्वात असलेला कच्चा रस्ता आहे. या रस्त्यावरून आदिवासी खैरासवाडी, घोटमाल, माडभोन, जावली, खरबाचीवाडी, निफाडवाडी, दोरेवाडी येथील आदिवासी बांधव गवत, पेंडा, भाजीपाला, वीट उद्योग, पोल्ट्री व्यवसायिक या रस्त्याचा वापर करतात त्यामुळे हा पूर्वापार असलेला रस्ता सुरू रहावा अशी मागणी स्थानिक आदिवासी ग्रामस्थांनी केली आहे. या रस्त्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून रुपये वीस लाख चा निधी वर्ग झालेला आहे सदर रस्त्याबाबत आपल्या कार्यालयाकडे ३- २ चा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर रस्त्याच्या प्रस्तावास तातडीने मंजुरी मिळाल्यास ग्रामस्थांच्या दृष्टीने सोयीचे होऊन जीवनमान उंचविण्यास मदत होईल असे देखील सांगण्यात आले आहे. सदर विषयासंदर्भात राहुल पाटील उपवनसंरक्षक वनविभाग अलिबाग यांची भेट घेतली असता त्यांनी प्रत्यक्ष रस्त्याची पाहणी केली जाईल आणि अभ्यासपूर्वक माहिती घेऊन योग्य तो निर्णय दिला जाईल असे सांगितले.

# तळा-आगरदांडा रस्त्यावरील बुरमी येथील पुलावरून वाहतुक सुरु



तळा: तळा आगरदांडा रस्त्यावरील पिटसई-बुरमी येथील पुल प्रवाशांसाठी खुला झाला असून या जुन्यापुलावरुन वहातूक सुरू झाल्याने प्रवाशांमधून समाधान व्यक्त केला जात आहे. या मार्गावर इंदापूर - तळा-आगरदांडा रस्त्याचे काम चालू असताना काही अडचणींमुळे या पुलाचे काम रखडले व नंतर पुन्हा चालू होऊन ते पुर्ण ही झाले. काही अडचणींमुळे त्यावरून वाहने सुरू झाली नव्हती. पुर्वीपासूनचा असणाऱ्या बुर्मीच्या या जुन्या पुलाची उंची कमी होती. पावसाळ्यात मुसळधार पाऊस पडला की पुलावर पाणी येत असे अशा वेळी वहातूक कोंडीला सामोरे जावे लागत असे या मार्गावरील मांदाड, कुडे,तारस्ते, रोवळा इत्यादी गावांतील नागरिक विद्यार्थी यांना समस्या निर्माण होत होत्या. आता मात्र नवीन बांधलेल्या पुलावरून वाहतूक सुरू झाल्याने प्रवाशांमधून समाधान व्यक्त केला जात आहे.

# पालीत माजी सैनिक साजिद शेख यांचा भव्य स्वागत सोहळा



पाली, देशासाठी १७ वर्षे सेवा बजावून मायभूमीत परतलेल्या वीर जवान साजिद लूखमान शेख यांचा पाली येथे भव्य स्वागत सोहळा पार पडला. छत्रपती शिवाजी महाराज चौक, गांधी चौक आणि खालचा मोहल्ला येथे मिरवणूक काढण्यात आली, जिथे पालीवासीयांनी मोठ्या उत्साहात त्यांचे स्वागत केले. साजिद शेख यांनी कोलकाता, कुपवाडा, गुवाहाटी, आसाम आणि लेह-लडाख येथे सैनिक म्हणून जबाबदारी पार पाडली. सीमेवर मातृभूमीचे रक्षण करत त्यांनी कठीण परिस्थितीत सेवा बजावली. या स्वागत सोहळ्यात पाली सुधागड आणि रायगड परिसरातील नागरिक, आजी-माजी सैनिक आणि कुटुंबीय मोठ्या संख्येने सहभागी झाले. नगरातील विविध भागांतून मिरवणुकीला उत्साहाने प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमात अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करत साजिद शेख यांचा सन्मान केला. त्यांच्या देशसेवेचा गौरव करत त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सैनिक म्हणून त्यांनी मातृभूमीचे संरक्षण केलेच, पण आता समाजासाठी कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.




# ट्रक आणि कारचा भीषण अपघात, चारजण जखमी



माणगाव: मुंबई - गोवा महामार्गावरील टेमपाले येथील उड्डाण पुलावर कारला ठोकर देत, ट्रक कारवर कोसळून झालेल्या भीषण अपघात झाला. सुदैवाने यामध्ये जीवितहानी झाली नसली, तरी चारजण जखमी झाले आहेत. हा अपघात (गुरुवारी) सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास झाला. या घटनेनंतर बराच काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. गोरेगांव पोलीस ठाण्याच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी संजय चंद्रभान चौधरी (वय २२, रा. वडाळा, मुंबई) हे आपल्या ताब्यातील एमएच०८,एएन-६७८५ या क्रमांकाची घार घेऊन, मुंबईकडून गोवाकडे जात असताना, महाडकडून माणगांवकडे येत असलेल्या एमएच१२,एचडी-३८३३ या क्रमांकाच्या ट्रकने, चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने, कारला समोरुन ठोकर दिली आणि त्यानंतर हा ट्रक कारवर कोसळला. हा अपघात इतका भीषण होता की, दोन्ही वाहने उड्डाण पुलावरुन खाली कोसळता कोसळता वाचली. त्यामुळे सुदैवाने यात जीवितहानी झाली नसली, तरी या अपघातात फिर्यादी संजय चौधरी, साहिल धर्मेंद्रकुमार गुप्ता (वय १९, रा. वडाळा-मुंबई), धनंजय चंद्रभान चौधरी (वय २०, रा. वडाळा मुंबई) आणि ट्रकचालक चंद्रकांत रामदास लडकत हे चौघे जखमी झाले. सर्व जखमींवर माणगांव उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या अपघातांनतर महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. अपघाताची माहिती समजताच गोरेगांव पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी इतरांच्या साह्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला करुन वाहतूक सुरळीत करण्यात आली. या प्रकरणी गोरेगांव पोलीस ठाण्यात ट्रकचालक रामदास लडकतच्या विरोधात भारतीय न्याय संहिताचे कलम २८१,१२५ अ, १२५ ब यांसह मोटार वाहन कायमदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी गोरेगांव पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक विजय सुर्वे आणि पोलीस उपनिरीक्षक एस. एन. रासकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार पी. के. घोडके हे अधिक तपास करित आहेत.

# मावळ, शिरूरमधील युवा सेनेच्या विविध पदाधिकारी नियुक्त्या



उरण : गामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने संघटनात्मक बदल केले आहेत. युवा सेना मावळ लोकसभा अध्यक्षपदी (पिंपरी, चिंचवड विधानसभा) राजेंद्र तरस यांची नियुक्ती केली आहे. त्याचबरोबर मावळ, शिरुर लोकसभा मतदारसंघातील विविध नियुक्त्या केल्या आहेत... शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील युवा सेनेच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. युवा सेनेचे कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक, सचिव राहुल लोंढे, किरण साळी, युवासेना सचिव पच्छिम महाराष्ट्र विश्वजीत बारणे यांनी या नियुक्त्या केल्या आहेत त्यामध्ये युवासेना मावळ लोकसभा अध्यक्षपदी (पिंपरी-चिंचवड) राजेंद्र तरस, युवासेना मावळ लोकसभा (मावळ विधानसभा) अध्यक्षपदी विशाल हुलावळे,युवासेना शिरूर लोकसभा अध्यक्ष (भोसरी – खेड विधानसभा) अजिंक्य उबाळे, युवासेना जिल्हाप्रमुख मावळ लोकसभा सागर पाचार्णे, युवासेना मावळ तालुकाध्यक्ष राजेश वाघुले, युवासेना पिंपरी-चिंचवड उपशहराध्यक्ष सुजित कांबळे, रविंद्र शेलार, दिगंबर गुंजाळ, युवासेना भोसरी विधानसभा उपशहराध्यक्ष ऋषिकेश कुकडे, युवासेना चिंचवड विधानसभा उपाध्यक्ष रोहित बांगर, युवासेना चिंचवड विधानसभा उपाध्यक्ष सागर शिंदे,सावित्रीबाई फुले विद्यापीठ उपाध्यक्ष अनिरूद्ध जाधव, युवासेना विभागउपाध्यक्ष गौरव राउळ यांच्या नियुक्त्या केल्या आहेत... शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण आत्मसात करुन शिवसेना पक्ष वाढीसाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे नियुक्ती झालेल्या पदाधिकाऱ्यांना सांगितले. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, शिवसेनेची ताकद युवा संघटना आहे... आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात युवकांना संधी दिली जाईल... त्यासाठी युवकांनी संघटन मजबूत करावे... मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी केलेले जनहिताची कामे लोकांपर्यंत पोहचवावित... आता उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे हे जनतेसाठी काम करित आहेत

# अखेर पिडको व चिंतुपाडा रस्त्याचे काम सुरू

## कामगार व कारखानदारांना दिलासा

**पालघर, दि. ८ : प्रतिनिधी**




पालघर शहरानजिक असलेल्या माहीम ग्रामपंचायत हद्दीतील पिडको ते चिंतू पाडा रस्ता  मागील अनेक वर्षांपासून रखडलेला होता. आता त्या रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामाला सुरुवात झाली असून त्यामुळे तेथील कामगार व कारखानदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून माहीम तालुक्यातील पिडको व चिंटूपाडा येथील कामगारांसाठी व औद्योगिक वसाहतीच्या कारखान्यांमध्ये जाणाऱ्या रस्त्यांची चाळण झाली होती. अखेर हे दोन्हीही रस्ते मंजूर झाले आहेत. पिडको वजन काटा (डूरियन कंपनी) ते अंतर्गत कारखान्यांमध्ये जाणारा रस्ता (जयंत प्रिंटरी कंपनी) तसेच जुने जिल्हाधिकारी कार्यालय ते चिंटू पाडा दासगाव असे दोन प्रमुख रस्ते काँक्रिटीकरणाचे मंजूर झाले आहेत.

गेल्या पाच ते सहा वर्षांपासून या दोन्ही रस्त्यांची पूर्णतः दुरवस्था झाली होती. पावसाळ्यात रस्त्यातून प्रवास करत असताना नागरिकांना अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या होत्या. रस्त्यात तब्बल अडीच ते तीन फूट पाणी सचत होते. तसेच कंपनीत अपघात घडला तर बचावकार्यांची वाहने नेताना अडचणीचे ठरत होते. तसेच या रस्त्यावरून ये-जा करत असताना अनेक दुचाकींचा अपघात घडून मोटरसायकल चालक जखमी झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. रस्त्यात पाणी साचून चिखल झाल्याने कामगारांना विशेषतः महिला कामगारांना या रस्त्यातून प्रवास करणे कठीण जात होते. अखेर आता हे दोन्ही रस्ते तयार होत असल्याने कामगारांच्या हाल प्रतिष्ठा थांबणार आहेत.

दोन्ही रस्त्यांसाठी एक कोटी 40 लाख रुपयांचा निधी एमएमआरडीएकडून मंजूर झाला आहे. या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ माहीम गावाच्या सरपंच प्रीती पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपसरपंच नरोत्तम राऊत, सदस्य रॉकी तांडेल, मुकेश करबट, औद्योगिक संस्थेचे संखे,महिंद्र शहा, शशांक शाह, जयेश शहा, मनीष पाटील आदी उपस्थित होते.

# अशोक धोडी हत्याकांडातील प्रमुख आरोपी अखेर जेरबंद

## अविनाश धोडी पाच महिन्यांपासून होता फरार

**डहाणू, दि. ८ : प्रतिनिधी**

तलासरी तालुक्यातील शिवसेनेचे कार्यकर्ते अशोक धोडी यांच्या अपहरण आणि खून प्रकरणात तब्बल पाच महिन्यांपासून फरार असलेला मुख्य आरोपी आणि पालघर जिल्ह्यातील कुख्यात दारू माफिया अविनाश धोडी याला अखेर पालघर स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. ही कारवाई नव्याने नियुक्त करण्यात आलेले जिल्हा पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. अविनाशला ८ जूनच्या पहाटे ३:३० वाजता केंद्रशासित प्रदेशातील सिलवासा येथे त्याच्या नातेवाईकांच्या घरी लपून बसलेला असताना ताब्यात घेण्यात आले.

अविनाश धोडी हा अशोक धोडी यांचा सख्खा धाकटा भाऊ असून, गेल्या अनेक वर्षांपासून दमण व दादरा-नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशांतून महाराष्ट्र व गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणावर अवैध दारू तस्करी करीत होता. या तस्करीतून दरमहा कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. यामुळेच तो पालघर जिल्ह्यात एक प्रभावशाली पण अत्यंत वादग्रस्त गुन्हेगारी चेहरा म्हणून ओळखला जात होता. अविनाश आणि अशोक यांच्यात गेल्या काही वर्षांपासून वैयक्तिक आणि व्यावसायिक कारणांवरून वाद सुरु होते. या वादातूनच अविनाशने अशोकवर यापूर्वीही हल्ल्याचे प्रयत्न केले होते, अशी माहिती कुटुंबीयांनी पोलिसांना दिली होती.

२० जानेवारी २०२५ रोजी अशोक धोडी यांचे वेवजी येथील घाटातून अपहरण करण्यात आले होते. यानंतर अविनाश आणि त्याच्या साथीदारांनी अशोक यांची अमानुष हत्या करून मृतदेह गुजरातमधील सरिगाम येथील एका बंद पडलेल्या दगड खाणीत कारसह फेकून दिला होता. तब्बल १२ दिवसांनी मृतदेह आढळून आल्यावर जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणात एकूण आठ आरोपी आहेत. त्यापैकी



चार आरोपींना सुरुवातीसच अटक करण्यात आली होती. मात्र, मुख्य सूत्रधार अविनाश धोडी याने चौकशीदरम्यान घोलवड पोलीस ठाण्यातून पलायन केले होते, ज्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. या घटनेनंतर जिल्हा पोलीस दलाने विशेष मोहीम आखून अविनाशचा शोध सुरू ठेवला होता. इतर दोन आरोपी मनोज राजपूत आणि आशिष धोडी हे अद्याप फरार असून, त्यांचा शोधही सुरू आहे. डहाणू न्यायालयाचे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पोळे यांनी या तीनही फरार आरोपींविरुद्ध २१ जून २०२५ पर्यंत न्यायालयात हजर राहण्याची उद्घोषणा केली आहे. त्यानंतरही आरोपी हजर न झाल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा न्यायालयाने दिला आहे.

अविनाश धोडीच्या शोधासाठी पालघर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन्स, गुप्त माहिती आणि नेटवर्कचा वापर केला. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी सिलवासा येथे एका नातेवाईकाच्या घरी त्याला अटक केली. अटकेच्या वेळी तो लपून बसलेला होता. अविनाशच्या अटकेनंतर आता या प्रकरणाच्या सखोल चौकशीला सुरुवात होणार आहे. त्याच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या दारू तस्करीचे जाळे, आर्थिक उलाढाली, आणि त्यामागील स्थानिक व राजकीय संरक्षकांची नावे उजेडात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या अटकेनंतर पालघर जिल्ह्यातील गुन्हेगारी टोळ्यांवर मोठा आघात होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या अटकेनंतर अशोक धोडी यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवण्याच्या लढ्यात मोठा टप्पा पार झाल्याचे मानले जात आहे. जिल्ह्यातील गुन्हेगारीला लगाम घालण्यासाठी ही अटक एक महत्त्वाची कारवाई ठरत असून, पोलीस दलाच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या गुन्ह्याच्या तपास व अटकेची कारवाई पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, डहाणू उपविभागीय पोलीस अधिकारी अंकिता कणसे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या पथकात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल व्हटकर, पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल सावंत देसाई, गोरखनाथ राठोड, रोहित खोत, राजेश वाघ, सुनील नलावडे, हवालदार दीपक राऊत, संदीप सूर्यवंशी, नरेंद्र पाटील, कैलास पाटील, दिनेश गायकवाड, भगवान आव्हाड, कपिल नेमाडे, विजय ठाकूर आणि संजय धांगड यांचा समावेश होता.

# अनेक वर्षापासून ठाण मांडून बसलेल्या तलाठ्यांच्या बदल्या 37 तलाठ्यांना जिल्हाधिकाऱ्यांचा दणका

**मनोर, दि. ८ : प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या महसूल विभागातील 37 तलाठ्यांच्या तालुक्याबाहेर बदल्या करण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी डॉ इंदुराणी जाखड यांनी एकाच तालुक्यात ठाण मांडून बसलेल्या तलाठ्यांच्या बदल्या अन्य तालुक्यात केल्याने अनेकांना धक्का बसला आहे. बदल्यांचे सर्वसामान्य नागरिकांकडून स्वागत केले जात आहे.

पालघर जिल्हा अस्तित्वात आल्यापासून अनेक जिल्हाधिकारी येऊन गेले. परंतु कोणीही गाव स्तरावर जनतेशी थेट संपर्क असलेल्या तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदलीच्या विषयाला हात घातला नव्हता. परंतु जिल्ह्यात प्रथमच मोठ्या संख्येने बदल्या करण्यात आल्या असून बदली प्रक्रियेत कोणताही वशिला कामाला आला नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांना नावडत्या ठिकाणी बदल्या मिळाल्या आहेत.

महसूल विभागाच्या गाव स्तरावरील कारभाराबाबत नेहमीच चर्चा होत असते. सध्या सहज तोही वारेमाप पैसा मिळू शकेल अशाच तहसील कार्यालयाच्या हद्दीतील महत्वाच्या तलाठी सजेत बदली मिळावी म्हणून अनेकजण प्रयत्नशील असतात.



तर त्याठिकाणी कार्यरत असलेले तलाठी अधिक काळ कार्यरत राहता येईल, यासाठी प्रयत्न करत असतात. तीन वर्षांपेक्षा अधिक काळ एकाच ठिकाणी सेवा करता येत नसतानाही जिल्ह्यातील अनेक तलाठी अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत होते. यापैकी काहींच्या कार्यपद्धतीबाबत आक्षेपही होते. त्या सर्वांनाच जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी दणका दिला आहे.

*दरवर्षी बदलीची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर त्याच ठिकाणी राहण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले जातत. तसेच निवासस्थानापासून जवळच्या ठिकाणची बदली मिळवली जात होती. परंतु आवडीच्या ठिकाणी बदलीसाठी प्रयत्नशील असलेल्यांच्या प्रयत्नांवर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने पाणी फेरले आहे. बदली प्रक्रिये दरम्यान बदलीसाठी पात्र तलाठ्यांकडून तीन ठिकाणचे पसंती क्रम मागवण्यात आला होता. पसंतीच्या ठिकाणच्या तीनपैकी एका ठिकाणी बदली करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या कामाचे निरीक्षण करून बदल्या केल्याचे दिसून येते.*

पालघर तालुक्यात कार्यरत उज्वला पाटील, मनीषा कांबळे, नितीन सुर्वे,हितेश आणि नीता साळवे यांची वसई तालुक्यात तर सोपान पवार, हितेश राऊत आणि संजय चुरी यांच्या बदल्या डहाणू तालुक्यात करण्यात आल्या आहेत. माहीम तलाठी सजेत कार्यरत रशीद अत्तार यांना सेवानिवृत्ती निमित्ताने मुदतवाढ देण्यात आली आहे.

# कंपनीच्या प्रदुषणामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात

## तोरणे शाळा बंद ठेवण्याचा इशारा

**वाडा, दि. ८ : प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील तोरणे ग्रामपंचायत हद्दीतील मे. शिवकृपा स्टील अन अलाइज प्रा.लि. या रासायनिक कंपनीमुळे प्रदूषण वाढले आहे. परिणामी या परिसरातील नागरिकांचे व जि. प. शाळेतील मुलांचे आरोग्य धोक्यात आले असून नागरिकांनी या कंपनी विरोधात लेखी व तोंडी तक्रारी केल्या. मात्र कंपनी मालक त्याला प्रतिसाद देत नाही. त्यामुळे कंपनी ठोस उपाययोजना करत नाही तोवर शाळा बंद करण्याचा इशारा भूमिपुत्र विकास फाउंडेशनने दिला आहे.

मे. शिवकृपा स्टील अन अलाईज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत होणाऱ्या रासायनिक प्रक्रियेतून निघणारा घातक धूर दिवसाढवल्या हवेत सोडला जातो. या वायुप्रदूषणामुळे शाळेत शिकणाऱ्या सुमारे 50 विद्यार्थ्यांच्या आरोग्याला तसेच हद्दीतील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. ग्रामस्थांनी कंपनी प्रशासनासह, प्रदूषण नियंत्रण मंडळ , वाड्याचे तहसीलदार, लोकप्रतिनिधी यांना याबाबत निवेदन देऊन कंपनी बंद करण्याची मागणी केली आहे. मात्र, आजवर कुठलीही कारवाई करण्यात आली नसल्याचे भूमिपुत्र विकास फाउंडेशन कडून सांगण्यात आले.

> कंपनीच्या विरोधातील नागरिक व भूमिपुत्र विकास फाउंडेशनची निवेदने प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पाठवली आहेत. प्रदूषण नियंत्रणाबाबत तपासणी करण्याचे काम प्रदूषण मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या आहे. त्यांच्या अहवालानंतर योग्य ती कारवाई केली जाईल.
>
> **- भाऊसाहेब अंधारे, तहसीलदार वाडा**

# तरुणीवर गोळीबारप्रकरणी हॉटेलमालकावर गुन्हा दाखल

**पालघर, दि. ८ : प्रतिनिधी**

केळवे येथील एका हॉटेलमध्ये अल्पवयीन मुलीवर गोळीबार केल्याप्रकरणी तिच्या मित्रासोबत हॉटेलमालकावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचबरोबर आरोपीला पिस्तुल मिळवून देणाऱ्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील प्रियकराला अटक करण्यात आली असून दोन्ही आरोपी फरार असून त्यांचा पोलीस शोध घेत आहेत.

बोईसरच्या लोखंडी पाडा येथे राहणारा दिनेश दिपक धोडी हा आपल्या मैत्रिणीला घेऊन ३० मे २५ रोजी केळवे येथे गेला होता. त्याठिकाणी दोघेही राऊत रेसिडेंसी हॉटेलमध्ये खोली घेऊन थांबले होते. खोलीत दिनेशने मैत्रीणीला गोळी मारून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. त्यात गंभीर जखमी झालेली मैत्रिणीची प्रकृत्ती सध्या स्थिर आहे.

याप्रकरणी मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिनेश धोडीला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी केळवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. तर मुलगी अल्पवयीन असतानाही खोली राहण्यास दिल्याप्रकरणी राऊत रेसिडेन्सीचा मालक अविनाश राऊत याच्यासह दिनेशला पिस्तुल मिळवून देणाऱ्याविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बचत गटाची कागदपत्रे आणा, बियाणे घेऊन जा

## कृषी विभागाचा अजब फतवा; बियाणापासून शेतकरी राहणार वंचित

**मोखाडा, दि. ८ : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांने पारंपारिक शेतीसोबत आधुनिकतेची कास धरावी,प्रयोगशील शेतकरी बनावा यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या माध्यमातून अनेक नावीन्यपूर्ण योजना राबवल्या जातात. पावसाळा आला की भात, नागली, तुर आदी वेगवेगळ्या प्रकारच्या वाणांची बियाणे कृषी विभागातून शेतकऱ्यांना लागवडीसाठी दिली जातात. परंतु यावर्षी कृषी कार्यालयाकडून देण्यात येणारी प्रायोगिक तत्त्वावरील भात,नागली या पिकाची बियाणे ही वैयक्तिक शेतकऱ्यांना न देता शेतकरी बचत गट किंवा महिला बचत गट यांना दिली जाणार आहेत. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे बचत गट नाहीत अशा शेतकऱ्यांना मात्र कृषी विभागातील बियाणे मिळण्यापासून वंचित रहावे लागणार आहे.

राज्य सरकारच्या कृषी विभागाच्या अंतर्गत तालुका कृषी कार्यालयाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या विकासासाठी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जात असून या उपक्रमाचा भाग म्हणून पावसाळा आला की शेतकऱ्यांना शेतीत लागवड करण्यासाठी भात,नागली,वरई,तुर आदी हळवा आणि गरवा वाणांची बियाणे वाटप केली जातात. परंतु दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तालुका कृषी कार्यालयात आलेली पिकांची बियाणे प्रायोगिक तत्त्वावर वैयक्तिक शेतकऱ्यांना न देता शेतकरी बचत गट किंवा महिला बचत गट यांनाच लागवडीसाठी दिली जाणार आहेत. त्यामुळे मागील वर्षा प्रमाणे यंदाही गोर गरीब शेतकऱ्यांना बचतगट केलेला नाही म्हणून प्रायोगिक तत्त्वावरील बियाणे मिळण्यापासून वंचित राहावे लागणार आहे.यामुळे प्रयोगशील उपक्रम राबवणारे कृषी कार्यालयातील अधिकारी जर गाव पाड्यातील ठराविक शेतकऱ्यांना हाताशी धरुन योजना राबवल्या असा गाजावाजा करत असतील तर वंचित शेतकऱ्यांनी दाद मागायची कोणाकडे ?, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

मोखाडा तालुक्याची लोकसंख्या लाखांवर जाऊन पोहचली असून जवळपास ९५ टक्के लोक शेती करतात. त्यामुळे निदान निम्म्यापेक्षा जास्त लोकांना तरी शेतीशी निगडित योजनांचा लाभ द्यायला हवा. परंतु शासकीय गाईड लाईन (नियमावली) जशी आली आहे, त्याप्रमाणेच शेतकऱ्यांना प्रायोगिक तत्त्वावरील बियाणे मिळणार आहेत. वैयक्तिक शेतकऱ्यांना लाभ दिला जाणार नाही,  असे कृषी सहाय्यकांनी सांगितले.

# वाड्यातील बांगलादेश घुसखोरांविरोधात किरीट सोमय्या सरसावले कुडूस ग्रामपंचायतीत येऊन जन्म प्रमाणपत्राबाबत घेतली माहिती

**वाडा, दि. ८ : प्रतिनिधी**



भाजपचे नेते व माजी खासदार किरीट सोमय्या यांनी आज वाडा तालुक्यातील कुडूस व वडवली या ग्रामपंचायतीत जाऊन जन्म नोंदणी प्रमाणपत्र यासंदर्भात माहिती ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडून जाणून घेतली. राज्यातील बांगलादेशीय घुसखोरांविरोधात किरीट सोमय्या यांनी मोहिम हाती घेतली असून आता त्यांना पालघर जिल्ह्यावर आपले लक्ष केंद्रीत केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी वाडा तालुक्यातील कुडूस ग्रामपंचायत हद्दीत माहिती गोळा करण्यास सुरुवात केली आहे.

वाडा तालुक्यातील काही भागात बांगलादेशीय नागरीक बेकायदेशीररित्या वास्तव्यास असल्याची माहिती मिळाल्याने किरीट सोमय्या यांनी कुडूस व वडवली या ग्रामपंचायतीत विलंबित जन्म नोंदणी व प्रमाणपत्र 1 जानेवारी 2024 ते 1 जानेवारी 2025 या दोन वर्षांत या दोन्ही ग्रामपंचायतीकडून किती विलंबित जन्म नोंद करण्यात आली ती संख्या सांगावी व किती लोकांना या काळा दरम्यान अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात आली याबाबतची माहिती माहितीच्या अधिकारात सोमय्या यांनी मागवली आहे.

या माहितीसाठी त्यांनी कुडूस व वडवली ग्रामपंचायतीला भेटी देऊन ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडून माहिती जाणून घेतली. जन्म प्रमाणपत्र कशाच्या आधारावर तुम्ही देता असा प्रश्न त्यांनी ग्रामपंचायत अधिकारी किरण हरड यांना विचारला असता त्यांनी ग्रामपंचायतीत असलेल्या नोंदीनुसार जन्म प्रमाणपत्र देत असल्याचे सांगितले.

यावेळी वाड्यातील प्रदूषण करणा-या कंपन्यासंदर्भात त्यांना पत्रकारांनी छेडले असता पालघरच्या जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड व प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सचिव यांच्याशी मी दूरध्वनीवरून संपर्क साधून प्रदूषण करणा-या कंपन्या बंद करण्याची मागणी केली असल्याचे सांगून येत्या 48 तासांत त्या बंद होतील, असा विश्वास त्यांनी बोलून दाखवला. भिवंडी वाडा रस्त्याच्या दुरवस्थेवर प्रश्न विचारला असता त्यावर त्यांनी बोलणे टाळले. किरीट सोमय्या यांच्यासमवेत भाजपचे स्थानिक कार्यकर्ते मंगेश पाटील, मोनिष पाटील, हेमंत पष्टे आदी उपस्थित होते. यावेळी वाडा पोलीसांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# एक लाख वृक्षारोपणांचा संकल्प

**वसई, दि. ८ : प्रतिनिधी**

वसईतील राजीव पाटील सामाजिक शैक्षणिक व कला क्रीडा मंडळाने  वसई तालुक्यात एक लाख प्रकारची विविध फळे, वनौषधी झाडे लावण्याच्या संकल्प हाती घेण्यात आला असून गेल्यावर्षी 22 हजार झाडे लावण्यात आली होती. यंदा जागतिक पर्यावरण दिनी वृक्षारोपणाला सुरुवात करण्यात आली आहे. विरारमधील यशवंत नगर परिसरात महापालिकेचे प्रथम महापौर यांच्या उपस्थितीत यंदाच्या वृक्षारोपण उपक्रम सुरु करण्यात आला आहे. यावेळी महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती जीतूभाई शाह, माजी महापालिका आयुक्त कल्याण केळकर, निलेश मांगेला, कृष्णा देशमुख उपस्थित होते. तसेच वसईतील सांडोर, गोखीवरे परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. माजी नगरसेवक सुनील आचोळकर, अंकुश कोथमिरे, संजय नारंग, अमित घरत, दिप्तेश पाटील, मुकेश सोनार, राकेश मानकर आदींनी यामोहिमेत भाग घेतला. येत्या पाच वर्षात वसईत आणखी 75 हजार झाडे लावण्यात येणार आहेत, अशी माहिती प्रथम महापौर राजीव पाटील यांनी दिली.



# महापालिकेच्या विविध विभागाची माहिती आता एका क्लिकवर

- माहिती अधिकार अंतर्गत पाच वर्षांची माहिती उपलब्ध
- महानगरपालिकेचा डिजिटल उपक्रम

**भाईंदर, दि. ८ : प्रतिनिधी**

मिरा भाईंदर महानगरपालिका नागरिकांच्या सेवेत सातत्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत असून, प्रशासन अधिक पारदर्शक, सुलभ आणि गतिमान करण्याच्या दिशेने पावले उचलत आहे. यादृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलताना महानगरपालिकेने 'व्हॉट्सअ‍ॅप चॅट बॉट सेवा' सुरू केली आहे. या सुविधेमुळे नागरिकांना आता अनेक सेवा आणि माहिती घरबसल्या, फक्त एका क्लिकवर मिळणार आहे. व्हॉट्सअ‍ॅप चॅट बॉट ही एक अत्याधुनिक संवाद प्रणाली असून नागरिकांनी फक्त ९९६७६ ११२३४ या क्रमांकावर "Hi" असा संदेश पाठवला की, पुढे एक संवाद सुरू होतो आणि नागरिकांच्या गरजेनुसार विविध पर्याय त्यांच्या स्क्रीनवर उपलब्ध होतात. या प्रणालीचा उद्देश म्हणजे नागरिकांना शासकीय कार्यालयात न जाता त्वरित आणि अचूक सेवा मिळवून देणे. मालमत्ता कर भरणा, मालमत्ता कर देयकाची दुय्यम प्रत आणि मालमत्ता कर भरणा पावती, पाणीपट्टी कर भरणा लिंक, पाणीपट्टी कर भरणा देयकाची दुय्यम प्रत आणि पाणीपट्टी कर भरणा पावती, आरटीएस सेवा (Right to Services), नागरिकांच्या तक्रारी नोंदवणे, आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित माहिती, पाणी टँकर बुकिंग सेवा, शासकीय रुग्णालयांची यादी, उद्यानांची माहिती, आणि स्मार्ट सिटी (MBMC City) संबंधित सेवा.अश्या सेवा नागरिकांना त्वरित माहिती व मदत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबवण्यात आला असून त्यांनी यासाठी संबंधित विभागांना कार्यक्षम व तत्पर सेवा देण्याचे निर्देश दिले आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका नागरिकांसाठी अधिक पारदर्शक, सुलभ व माहितीपूर्ण सेवा देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत महापालिकेचे अधिकृत संकेतस्थळ अद्ययावत करण्यात आले आहे. या अद्ययावत संकेतस्थळावर माहिती अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 4(1) (ख) नुसार मागील पाच वर्षांतील स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची माहिती प्रकाशित करण्यात आली आहे. यासोबतच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1989 मधील कलम 60 (अं) अंतर्गत मागील पाच वर्षांतील 13 महत्त्वाच्या मुद्यांची माहिती देखील अद्यावत करण्यात आली आहे. याशिवाय, माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत मागील पाच वर्षांमध्ये प्राप्त झालेल्या अर्जांची नोंद व त्या अर्जांना देण्यात आलेल्या उत्तरांची माहिती देखील संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. महापालिकेच्या विविध विभागांमार्फत ठेकेदारांशी करण्यात आलेले कार्यादेश व करारनाम तसेच प्रभागनिहाय अनधिकृत बांधकामांची यादी यांची सविस्तर माहिती आता संकेतस्थळावर उपलब्ध असून, नागरिकांना याचा सहज उपयोग करता येणार आहे. नवीन अद्ययावत संकेतस्थळात व्हॉइस ओव्हर प्रणालीचा समावेश करण्यात आला असून, हे संकेतस्थळ दृष्टिहीन आणि दिव्यांग नागरिकांसाठी उपयुक्त ठरणार आहे. तसेच महापालिकेच्या विविध उपक्रमांचे फोटो आणि व्हिडिओ वेळोवेळी अद्ययावत केले जात असून, मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन अधिक पारदर्शक व उत्तरदायी होण्याच्या दिशेने सातत्याने वाटचाल करत आहे.

# पतीवरील प्रेमाचे प्रतीक : वट पौर्णिमा

वट पौर्णिमा ज्याला वट सावित्री व्रत देखील म्हणतात. हा महाराष्ट्र, गोवा या पश्चिम भारतीय राज्यांमध्ये विवाहित महिलांनी साजरा केलेला हिंदू उत्सव आहे. तात्विक दृष्टिकोनातून, वटवृक्ष दीर्घायुष्य आणि अमरत्वाचे प्रतीक म्हणून देखील स्वीकारले जाते. वटवृक्ष हे ज्ञान आणि निर्वाणाचेही प्रतीक आहे. भगवान बुद्धांना याच झाडाखाली ज्ञान प्राप्त झाले. म्हणूनच पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटवृक्षाची पूजा करणे हा या व्रताचा भाग झाला. कथा कर्माबरोबरच स्त्रिया उपवास करतात आणि पूजा करतात आणि परिक्रमेदरम्यान वटवृक्षाभोवती सुताचे धागे गुंडाळतात. एक विवाहित स्त्री तिच्या पतीवरील प्रेमाचे प्रतीक झाडाभोवती एक औपचारिक धागा बांधून दर्शवते. या व्रतामागे एक पारंपरिक सावित्री आणि सत्यवान यांची पौराणिक आख्यायिका सांगितली जाते. वटपौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करतात. पर्यावरणशास्त्राच्या दृष्टीने वडाचे महत्त्व विशेष असल्याने त्याच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा ही पूजेचा एक हेतू आहे. वट सावित्री व्रत शुभ आणि संतान प्राप्तीसाठी मदत करणारे मानले जाते. भारतीय संस्कृतीत हे व्रत आदर्श स्त्रीत्वाचे प्रतीक बनले आहे. या व्रताच्या तिथीबाबत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. स्कंद पुराण आणि भविष्योत्तर पुराणानुसार ज्येष्ठ महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेला हे व्रत करण्याचा नियम आहे, तर निर्णयामृत वगैरेनुसार ज्येष्ठ महिन्यातील अमावास्येला उपवास करण्याचे सांगितले आहे.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी पासून पौर्णिमेपर्यंत हे त्रिरात्र व्रत करावे असे सांगितले आहे. तीन दिवस उपवास करणे अशक्य असेल त्यांनी फक्त पौर्णिमेलाच उपवास करावा. सावित्रीसह ब्रम्हदेव ही या व्रताची मुख्य देवता असून सत्यवान-सावित्री, नारद व यमधर्म या उपांग देवता आहेत. या व्रताचा विधी असा, नदीकाठची वाळू आणून पात्रात भरावी, तिच्यावर सत्यवान आणि सावित्री यांच्या मूर्ती ठेवाव्यात मग त्यांची षोडशोपचारे पूजा करावी. त्यानंतर पाच अर्घ्ये द्यावीत, मग सवित्राची प्रार्थना करावी. पूजा झाल्यावर संध्याकाळी सुवासिनीसह सावित्रीची कथा ऐकावी. या व्रतात सावित्रीच्या मूर्तीची पूजा सांगितलेली असली तरी रूढी मात्र वेगळी आहे. सावित्रीने आंतरिक गुणांची पारख करून निवडलेल्या वरास आई-बाप आणि देवगुरू यांच्या विरोधाला डावलून माळ घातली व पतीचे प्राण वाचवण्याचे अवघड काम चिकाटीने, दुर्दम्य इच्छाशक्तीने आणि चातुर्याने करून दाखविले. योगी अरविंद यांनी आध्यात्मिक परिभाषेतून सावित्रीचे महत्त्व सांगणारे सावित्री नावाचे महाकाव्य लिहिले आहे.



वटवृक्षाचे पूजन आणि सावित्री-सत्यवान कथेचे स्मरण करण्याच्या विधीमुळे हे व्रत वट सावित्री म्हणून प्रसिद्ध झाले. भारतीय संस्कृतीत सावित्रीला ऐतिहासिक पात्र मानले जाते. सावित्री म्हणजे वेदमाता गायत्री आणि सरस्वती. सावित्रीचा जन्मही विशेष परिस्थितीत झाला. भद्रा देशाचा राजा अश्वपती यांना मूलबाळ नव्हते असे म्हणतात. त्यांनी संततीप्राप्तीसाठी मंत्रोच्चारांसह दररोज एक लाख अर्पण केले. हा क्रम अठरा वर्षे चालू राहिला. यानंतर सावित्री देवी प्रकट झाली आणि वरदान दिले की, राजन, तुझ्या पोटी एक तेजस्वी मुलगी होईल. सावित्रीदेवीच्या कृपेने जन्माला आल्याने मुलीचे नाव सावित्री ठेवण्यात आले. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याचा धृमत्सेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच असल्याचे माहित असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला दिला. पण सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला व जंगलात येऊन ती नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागली.


सत्यवानाचा मृत्यू जेव्हा तीन दिवसावर येऊन ठेपला तेव्हा तिने तीन दिवस उपवास करून सावित्री व्रत आरंभिले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्या बरोबर गेली. लाकडे तोडता-तोडता त्याला घेरी आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा सावित्रीस परत जाण्यास सांगितले. पण तिने साफ नाकारले व पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासू-सासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने गफलतीने तथास्तु म्हटले. तेव्हा त्याला वचनबद्ध झाल्याची आठवण झाली व सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व वट सावित्री व्रत आचरतात. सर्व पवित्र वृक्षांत वटवृक्षाचे आयुष्य जास्त असून पारंब्यांनी त्याचा विस्तारही खूप होतो. अशा वटवृक्षाची पूजा करून स्त्रिया मला व माझ्या पतीला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभू दे, धनधान्य व मुले-नातू यांनी माझा प्रपंच विस्तारित व संपन्न होऊ दे, अशी प्रार्थना करतात.

सण आहे सौभाग्याचा, बंध आहे
अतूट नात्याचा ।
या शुभदिनी पूर्ण होवोत तुमच्या
सर्व इच्छा ।।
वट पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!



प्रविण बागडे, नागपूर
मो.नं. ९९२३६२०९१९
ई-मेल
pravinbagde@gmail.com

# डॉ. पीएसजी कुमार: ग्रंथालय माहिती विज्ञान क्षेत्रात अतुलनीय योगदान





**(डॉ. पीएसजी कुमार जयंती विशेष ९ जून २०२५)**

ग्रंथालयांशिवाय शिक्षण क्षेत्राचे अस्तित्व अशक्य आहे, कारण ग्रंथालयांना शिक्षणाचा पाया म्हणतात आणि दर्जेदार ग्रंथालये ही एका मजबूत शिक्षण व्यवस्थेचा आधार आणि प्रतिबिंब आहेत. ग्रंथालयांचा चांगला विकास हा उज्ज्वल भविष्याचा पाया रचतो. जेव्हा आपण देशातील ग्रंथालयांच्या विकासाबद्दल बोलतो तेव्हा आपल्याला निश्चितच त्या महान व्यक्तींची आठवण येते ज्यांनी या क्षेत्रात मोलाची कामगिरी पटकावली. आज आपण अशाच एका महान व्यक्तीबद्दल बोलत आहोत ज्यांनी आपल्या असाधारण कार्याद्वारे ग्रंथालय माहिती विज्ञान क्षेत्राला नवीन उंचीवर नेले आहे. डॉ. पीएसजी कुमार, ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य ग्रंथालय माहिती विज्ञान क्षेत्राच्या विकासासाठी समर्पित केले. ज्यांना देशात या क्षेत्रासाठी आदर्श म्हणून पाहिले जाते. त्यांनी देशात महत्त्वाच्या पदांवर काम केले आणि परदेशात विविध प्रसंगी भारताचे प्रतिनिधित्व देखील केले. देशभरातील ग्रंथालय माहिती विज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांचे स्वप्न होते की डॉ. पीएसजी कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली काम करून काहीतरी शिकावे. लोक त्यांना ग्रंथालय माहिती विज्ञानाचा विश्वकोश म्हणतात. ते गुणांचे खजिना होते. ग्रंथालय क्षेत्राचे संपूर्ण ज्ञान आणि त्याच्या विकासाशी संबंधित कार्यपद्धती त्यांच्या मनात कोरली होती.

त्यांच्या उत्कृष्ट योगदानामुळे आणि दर्जेदार कार्यामुळे, डॉ. पीएसजी कुमार यांना ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एसआर रंगनाथन यांच्या समतुल्य मानले जाते. डॉ. पीएसजी कुमार यांनी त्यांचे बहुतेक कार्यकाळ नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहिती विज्ञान विभागात घालवले. ते अनेक गोष्टीत प्रतिभावान होते, विचारशील, बुद्धिमान, मृदुभाषी, वक्तशीर आणि कामासाठी नेहमीच तत्पर. एक प्रतिभावान संशोधक, वैज्ञानिक दृष्टिकोन, कामात पद्धतशीर, व्यवस्थापनात कार्यक्षम, लोकांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात मानवतावादी, निर्णय घेण्यास तार्किक, अडचणी हाताळण्यात मेहनती आणि प्रामाणिक, एक चांगला शिक्षक, आदर्श ग्रंथपाल, उत्तम संघटक, सक्षम प्रशासक, कुशल मार्गदर्शक, उत्कृष्ट लेखक, वक्ता आणि समीक्षक सारख्या अनेक भूमिकांमध्ये ते पारंगत होते.

डॉ. पीएसजी कुमार यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचंड प्रसिद्धी मिळवली. त्यांना युनेस्को, एफआयडी, आयएफएलए तर्फे फेलोशिप ने सन्मानित केले. एबीसी केंब्रिजकडून इंटरनेशनल मैन ऑफ द ईयर, एबीआय, यूएसएकडून मैन ऑफ द ईयर, सेक्युलर इंडिया हार्मोनी अवार्ड, पंजाब विद्यापीठाकडून सत्ताल पंजाब ग्रंथपाल पुरस्कार, पी.एस. तेलुगू विद्यापीठ, हैदराबाद तर्फे प्रो. पी. गंगाधर राव पुरस्कार, कौला एंडोमेंट फॉर लायब्ररी सायन्सकडून रंगनाथन कौला पुरस्कार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाकडून एमेरिटस फेलो देखील मिळाले. त्यांनी आयएफएलए (इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ लायब्ररी असोसिएशन) च्या निमंत्रणावरून यूके, यूएसए, मॉरिशस आणि फ्रान्सला भेट दिली आणि परिषदांमध्ये भाग घेतला, फीड (इंटरनॅशनल डॉक्युमेंटेशन फेडरेशन), कॉमला (कॉमनवेल्थ लायब्ररी असोसिएशन), एएलए (अमेरिकन लायब्ररी असोसिएशन) यामुळे त्यांचे आंतरराष्ट्रीय संपर्क वाढले होते. त्यांनी देशातील जवळजवळ सर्व राज्ये आणि विद्यापीठांना भेटी दिल्या. ते ७७ हून अधिक विद्यापीठांशी जुडून होते आणि त्यांनी विविध संस्था/विद्यापीठांमध्ये १६८ हून अधिक व्याख्याने दिली. त्यांचे चरित्रात्मक प्रोफाइल १६ हून अधिक आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय चरित्रात्मक स्त्रोतांमध्ये प्रकाशित झाले.

त्यांनी भारत आणि परदेशातील प्रसिद्ध संशोधन जर्नल्सच्या संपादकीय मंडळांवर काम केले. त्यांच्या कार्यकाळात, डॉ. कुमार यांनी अनेक संस्था आणि संघटनांमध्ये महत्त्वाची पदे भूषवली. ते विदर्भ शैक्षणिक ग्रंथालय संघटनेचे अध्यक्ष होते, भारतीय ग्रंथालय आणि माहिती विज्ञान शिक्षक संघटनेचे सरचिटणीस, उपाध्यक्ष आणि अध्यक्ष होते, केंद्रीय शिक्षण आणि प्रशिक्षण विभागीय समितीचे अध्यक्ष, १९९०-९६ मध्ये भारतीय ग्रंथालय संघटनेचे उपाध्यक्ष आणि अध्यक्ष, इंडियन असोसिएशन ऑफ स्पेशल लायब्ररीज अँड इन्फॉर्मेशन सेंटर्सचे दोन वेळा कौन्सिल सदस्य व अध्यक्ष, सार्क देशांचे ग्रंथालय संघ, गुड ऑफिसेस कमिटी, संयुक्त भारतीय ग्रंथालय संघटनांचे परिषद आणि भारतीय ग्रंथालय आणि माहिती सेवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष म्हणून, त्यांचे कार्य प्रशंसनीय आहे. त्यांनी भारतातील ग्रंथालय व्यवसायाच्या विकासात अमूल्य योगदान दिले. डॉ. कुमार यांनी २००४ मध्ये विदर्भ ग्रंथालय संघटनेची स्थापना केली आणि तरुण व्यावसायिकांना त्यांचे सर्जनशील कौशल्य प्रदर्शित करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात ग्रंथालय माहिती विज्ञान विभागप्रमुख, ग्रंथपाल आणि व्याख्याता देखील होते. त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलसचिव पद देखील भूषवले. डॉ. पीएसजी कुमार यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने ग्रंथालय आणि माहिती विज्ञान क्षेत्रात एमेरिटस फेलोशिप देऊ केली होती. ही फेलोशिप भारतातील ग्रंथालय चळवळ आणि राज्यनिहाय विकास या विषयावर संशोधन करण्यासाठी दोन वर्षांच्या कालावधीसाठी होती.

डॉ. पीएसजी कुमार यांनी ११८ हून अधिक संशोधन लेख, विविध जर्नल्समध्ये ६८ चर्चासत्र पेपर्स, ७९ हून अधिक पुनरावलोकने, १२ प्रस्तावना, ३ तांत्रिक नोट्स लिहिले, विविध विषयांवर ६० हून अधिक पुस्तके प्रकाशित केली (इंडियन एन्सायक्लोपीडिया ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स (२३ खंडांमध्ये) जे त्यांनी संपादित केले ते वगळता), ते ८ हून अधिक व्यावसायिक जर्नल्सशी संपादक व संपादकीय मंडळ सदस्य म्हणून संबंधित होते. यापैकी महत्त्वाचे म्हणजे आयएटीएलआयएस कम्युनिकेशन्स, आयएलए बुलेटिन, आयएलए न्यूजलेटर, हेराल्ड ऑफ लायब्ररी सायन्स अँड इन्फॉर्मेशन एज. आयएलए द्वारे स्वरूप, मांडणी आणि आशयाची पुनर्रचना करून त्यांनी आपली संपादकीय क्षमता सिद्ध केली. 'लायब्ररीज इन इंडिया सिरीज' आणि 'इंडियन एन्सायक्लोपीडिया ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स' हे २३ खंडांमध्ये प्रकाशित झालेले त्यांच्या ज्ञान आणि लेखन कौशल्याचे प्रतीक आहेत. डॉ. पीएसजी कुमार यांनी 'माहितीयुग' हे त्रैमासिक मासिक मराठीत आणि 'इन्फॉर्मेशन एज' हे इंग्रजीत सुरू करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, ज्याला अल्पावधीतच राष्ट्रीय कीर्ती मिळाली.

डॉ. कुमार यांच्या अथक प्रयत्नांमुळेच विदर्भात ग्रंथपालांसाठी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू झाला. मोठ्या प्रयत्नांनी त्यांनी १९८४ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात एमएलआयएससी अभ्यासक्रमाची अंमलबजावणी सुरू केली. देशातील त्यांच्या समकालीन लोकांमध्ये त्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरेट पदवीधारकांची संख्या सर्वाधिक होती. त्यांनी ग्रंथालय विज्ञानाच्या जगाशी संबंधित विविध विषयांवर लेखन सुरू ठेवले. ग्रंथालय विज्ञानाचे असे कोणतेही क्षेत्र नाही ज्यावर त्यांनी लिहिले नाही. डॉ. कुमार यांच्यावर पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन यांचा सर्वाधिक प्रभाव होता, ज्यांना भारतातील ग्रंथालय विज्ञानाचे जनक म्हटले जाते. ते अनेक प्रकारे डॉ. रंगनाथन यांचे कट्टर अनुयायी होते आणि त्यांची कर्तव्ये पार पाडताना ते पूर्ण अलिप्ततेचा संदेश देत असत.



डॉ. प्रितम भि. गेडाम
(असीस्टेंट प्रोफेसर)
+०८२३७४१७०४१
prit00786@gmail.com

रंगनाथन यांच्यानंतर, प्रा. पी.एन. कौला यांचा सर्वात जास्त प्रभाव होता, कौला त्यांना मुलगा मानत होते आणि प्रोत्साहनाचा स्रोत देखील मानत.

डॉ. पीएसजी कुमार यांनी १९७२ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालय माहिती विज्ञान विभागाची जबाबदारी स्वीकारली आणि त्यांनी त्यांच्या कार्यशैलीने या विभागाला राष्ट्रीय स्तरावर एक वेगळी ओळख मिळवून दिली. आज त्यांचे विद्यार्थी देश-विदेशातील मोठ्या शैक्षणिक संस्थांमध्ये सर्वोच्च पदांवर काम करत आहेत. डॉ. पीएसजी कुमार यांच्या कार्याचा प्रत्येक पैलू आपल्याला काहीतरी नवीन शिकण्याची प्रेरणा देतो. त्यांनी त्यांच्या वैयक्तिक संग्रहातील पुस्तकांची मौल्यवान भांडवल संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या ग्रंथालयाला दान केली. ग्रंथालय आणि माहिती विज्ञान या विषयावर स्थापनेसाठी आणि व्याख्यानांसाठी त्यांनी नागपूर विद्यापीठाला एक लाख रुपये दान केले. त्यांच्या कार्यापासून प्रेरित होऊन डॉ. पीएसजी कुमार ग्रंथालय फाउंडेशनची स्थापना झाली आहे. ग्रंथालय माहिती विज्ञान या विषयाच्या विकासासाठी आणि समृद्धीसाठी ते आयुष्यभर परिश्रमी आणि कष्टाळू राहिले, हा वारसा अधिक चांगल्या प्रकारे पुढे नेणे आपले कर्तव्य आहे. देशातील ग्रंथालय माहिती विज्ञानाशी संबंधित कोणत्याही परिषद, चर्चासत्र, कार्यशाळा किंवा इतर कार्यक्रमात त्यांचे नाव नेहमीच घेतले जाते. ते आज आपल्यात नाहीत, परंतु ग्रंथालय माहिती विज्ञान या विषयातील त्यांच्या अमूल्य योगदानाचे हे क्षेत्र नेहमीच स्मरण करेल आणि ऋणी राहील.

# जननायक बिरसा मुंडा



आज ९ जून, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले. एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# भगवद्गीतेत जीवनाचा प्रवाह : स्वामी देवेंद्रानंदगिरी

भगवद्गीतेत जीवनाचे सत्य दडले असून जीवनात येणाऱ्या अडचणींचे कारण व निवारण दोन्ही गोष्टी सविस्तरपणे सांगण्यात आल्या आहेत म्हणून गीतेचा उपदेश जगभरात प्रसिद्ध आहे व प्रत्येक वर्गास प्रभावित करतो. गीता डॉक्टरप्रमाणे आहे. फरक इतकाच आहे की, डॉक्टर शारिरीक रोगांवर उपचार करतो व गीता मनातील रोग दुर करण्याचा मार्ग दाखवते. ज्याप्रकारे डॉक्टर रोगीचे रोग निवारण करण्यासह त्याचे कारण सांगतो, त्याप्रकारे जर गीतेचा सखोल अध्ययन केले तर मनातील रोगांचे कारण व निवारण दोन्ही समजतात. गीता मनाचे रोग दुर करण्याचे सशक्त माध्यम आहे. गीता ज्ञानामुळे मानवी जीवनातून मोह सहज दुर केला जाऊ शकतो. जीवनात दुःखाचे सर्वात मोठे कारण मोहच आहे. जर जीवनाला यशस्वी बनवायचे असेल व मोहातून मुक्त व्हायचे असेल तर गीतेच्या शरणात जावे लागेल. गीतेतून ज्ञान मिळवून मानव मोक्ष मिळवू शकतो.

**(गुरु वचन)**

गीतेचे ज्ञान मानवाला त्याची आत्मा अमर होण्याच्या विषयात बोध करुन आपले कर्तव्य कर्म पूर्ण निष्ठेने करण्यास प्रेरित करतो. ईश्वराने मानवी देह फक्त भोगासाठी प्रदान केला नसून याचा उपयोग मोक्ष प्राप्तीसाठी केला पाहिजे. यासाठी आपण भजन, सत्संग, समाजसेवा व लोककल्याणाचे कार्य केले पाहिजे. साधु व नदी कधीच एका ठिकाणी थांबत नाही व सतत पुढे जात विविध ठिकाणी लोकांच्या हृदयात आपले ज्ञान व भक्तीच्या प्रभावाने त्यांना आनंदित करतो. प्रत्येक मानवास पुर्ण श्रद्धा व निष्ठेने उपकारासाठी तयार राहिले पाहिजे. आपल्या ज्ञानाने जग प्रकाशित करण्याचा प्रयत्न करत राहिले पाहिजे, वास्तवात हाच मानव धर्म आहे.

## अशोकायन...

### विणवणी

हे वरुणराजा –
उशीरा का बरस पण
मधात पाडू नको खंड
नाहीतर बळीराजाला
विकावा लागेल भूखंड ..!

मारावे की तारावे
आहे तुझ्या हाती
एवढी कृपा कर
दयाधना आमच्या वरती ..!

समतोल बरसून
येऊ दे पिके बहरून
बळीच्या मनोकामना
पूर्ण कर तुझ्या हातून .. !



प्रा. अशोक सारडा, गेहकर.
(९४२२३९४३३९)

**वाचक लिहितात**

## राऊत, हे वागणे बरे नव्हे!

नुकत्याच पार पडलेल्या आयपीएल स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळूर संघ तब्बल १८ वर्षांनी विजेता ठरला. विजेतेपद मिळाल्याच्या प्रित्यर्थ आनंद साजरा करण्यासाठी चिन्नास्वामी क्रीडांगणावर विजयी सोहळा आयोजित करण्यात आला होता. भारतात क्रिकेटचे किती वेड आहे, हे सांगण्याची गरज नाही. म्हणूनच त्या सोहळ्याला आणि विजयी मिरवणुकीला अक्षरशः लाखो क्रिकेट चाहत्यांनी गर्दी केली. पोलिसांचा बंदोबस्त तैनात होता. परंतु, इतकी गर्दी होईल, याची कोणालाही कल्पना नसल्याने एकच गोंधळ उडाला. गर्दीला नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला. अचानक लाठीमार झाल्याने पळापळ सुरू झाली; आणि चेंगराचेंगरी झाली.

होऊ नये अशी दुर्घटना झाली; आणि यात ११ क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला. तर, ३३ जण जखमी झाले. या दुर्घटनेमुळे विजयोत्सवाला गालबोट लागले, हे मात्र नक्की. वाटले होते कर्नाटक सरकार हा कार्यक्रम पुढे ढकलेल. परंतु, या गंभीर दुर्घटनेकडे दुर्लक्ष करत खेळाडूंचा सत्कार करून त्यांच्यावर लाखो रुपयांच्या बक्षिसांची उधळण करण्यात आली.

या दुर्घटनेबद्दल आपले अतिविद्वान विश्वप्रवक्ते संजय राऊत यांना पत्रकारांनी विचारले असता, त्यांनी यात सरकारचा काहीही दोष नसून, किती गर्दी करावी? हे लोकांना समजायला हवे, असा प्रतिप्रश्न करून एकप्रकारे या दुर्घटनेला क्रिकेट चाहत्यांनाच जबाबदार धरले. कारण, कर्नाटकात काँग्रेसचे सरकार असल्याने त्यांचा नाईलाज झाला. पण, याच महाशयांनी प्रयागराज येथे कुंभमेळ्यात आणि मागच्या वर्षी दहीसर येथे आप्पा धर्माधिकारी यांच्या कार्यक्रमावेळी झालेल्या चेंगराचेंगरीला सरकारला जबाबदार धरून प्रचंड तोंडसुख घेतले होते. कारण, दोन्ही ठिकाणी भाजपचे सरकार आहे. यावरून त्यांच्या मनात भाजपबद्दल किती द्वेष, तिरस्कार, असुया, मळमळ आहे, हे स्पष्ट होते. याला टीका नव्हे तर, गरळ ओकणे म्हणतात. अर्थात, २४ तास मुर्खांच्या नंदनवनात फिरणा-या 'माथेफिरू'कडून काय अपेक्षा ठेवणार? एका (सं) पादकाला अशी 'डबल ढोलकी' वाजवणे शोभते का? म्हणूनच त्यांना सांगावेसे वाटते की, राऊतसाहेब, हे वागणे बरे नव्हे!

**– प्रदीप व्ही. खोलमकर,**
**नाशिक.**

## सणांवर विनोद करू नका !

आताचे युग हे सोशल मीडियाचे युग आहे. तरुणाई दिवसातील आपला बराच वेळ हा सोशल मीडियावर व्यतीत करत असते. सण-उत्सव जवळ आले की त्याविषयी जशा माहिती देणाऱ्या रिल्स सोशल मीडियावर येऊ लागतात तशा त्या सण-उत्सवांवर विनोद करणाऱ्या, सणांविषयी गैरसमज पसरवणाऱ्या रिल्स आणि व्हिडीओज सोशल मीडियावर फिरू लागतात. वटपौर्णिमा जवळ आल्याने वटपौर्णिमा सण साजरा करण्यामागील शास्त्र अथवा या सणाचे महत्व लक्षात न घेता त्यावर फालतू विनोद करणाऱ्या अनेक रिल्स सध्या मोबाईलवर येऊ लागल्या आहेत. हिंदू असूनही आपल्याच सणांवर विनोद करणाऱ्या त्या रिल्स पाहून आपण हसत आहोत आणि त्या इतरांनाही पाहण्यासाठी फॉरवर्ड करत आहोत. वटपौर्णिमा झाली की सण-उत्सवांना सुरुवात होते. सृष्टीत होत जाणारे बदल तसेच धर्मग्रंथातील सत्यकथा यांचा आधार हिंदू धर्मातील सण आणि उत्सवांमागे दडलेला असतो. प्रत्येक गोष्ट ही ईश्वराचेच रूप असून जीवसृष्टीसह निर्जीव वस्तूतही त्याचे अस्तित्व असते त्यामुळे या सर्वांचा सन्मान करण्याची शिकवण या सणांच्या माध्यमांतून आपल्याला मिळत असते. वटपौर्णिमेला वडाला म्हणजेच वृक्षाला पुजले जाते. नागपंचमीला नागाला, तर पोळ्याच्या दिवशी बैलाला पुजले जाते. दसऱ्याच्या दिवशी वापरातील उपयुक्त शस्त्रांचे आणि वस्तूंचे पूजन केले जाते. पितृपक्षाच्या निमित्ताने कावळ्याच्या रूपाने पूर्वजांना घास भरवला जातो. अशाप्रकारे चराचरावर निरपेक्ष प्रेम करायला शिकवणारे हिंदू धर्मातील सण हिंदू धर्माचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. आताच्या पिढीवर असलेला पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव आणि घरातून सणांविषयी न मिळणारे ज्ञान यांमुळे हिंदूंच्या सण-उत्सवांवर विनोद करताना आणि ते फॉरवर्ड करताना यांना फारसे वावगे वाटत नाही; मात्र ज्यांना आपले सण आणि उत्सव याविषयीचा सार्थ अभिमान आहे त्यांनी अशा रिल्स किंवा व्हिडीओज पुढे न पाठवता ते पाठवणाऱ्यांना सणांमागील शास्त्र सांगावे,

**सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**












# शब्दकोडे क्रमांक २१३२



**आडवे शब्द :-**

१) विचार न करता मनात येईल तसे बोलणे (वा.प्र.)
१०) कार्य, काम
१२) उद्याच्या नंतरचा दिवस
१३) बडबड
१४) बरोबर आलेला फौजफाटा
१६) जाळणे(प्रेत)
१८) खूण, इशारा
२०) धान्याचे जाडसर पीठ
२१) शंकराच्या डोळ्यांची संख्या
२३) सूट
२४) पर्जन्य
२६) सुगंध
२८) गणेशाची आई
२९) अंधार
३१) लाकडी जिना
३४) खुळचट, दुर्बळ माणूस
३५) अत्यंत गोड चव, बोलणे इ
३६) गव्हाची एक जात
३७) समतल
३९) पोट
४०) थुईथुई नाचणारा
४१) श्रीमंत, धनवान
४२) हा शब्द दोनदा लिहिल्यास एक मैदानी खेळ
४३) नष्ट, नामशेष
४६) अजगर
४७) फाजील अभिमान, अहंकार
४९) तुटण्यास कठीण, कडक व चिवट
५०) गणपती
५२) पूजेचे ताट
५४) रामाचे एक नाव
५५) दरवाजा
५७) हस्त
५९) जय पराजय
६१) ऐट, डौल
६२) दृष्टादृष्ट
६७) अर्धी ओंजळ
६९) प्रहर
७१) निवड न करता, एकंदरीने सर्व
७४) बैलाच्या गळ्यात बांधण्याचा दोर
७६) पैशाशी पैसा जोडणारा, चिक्कू माणूस
७७) कपाळभर लावलेले कुंकू
७९) फुरसत
८०) सैन्य दल
८१) सबब, निमित्त

**उभे शब्द :-**

१) हजेरी
२) खंदक
३) मध्यस्थ
४) आयुष्य
५) ब्राह्मण
६) सौंदर्य लाभलेली
७) वड
८) डोके
९) रक्ताचा रंग
१०) रात्री चमचणारा किटक
११) खर्चाच्या विरुद्धची बाजू
१५) उत्तराधिकारी
१७) नांगर
१८) अखंड पडणारा पाऊस
१९) शोध, माग
२२) नूतन
२३) सगळीकडे
२५) ओहोटीच्या विरुद्ध
२७) सलोखा, मेळ, एकीकरण
२८) फार मोठी आणि पुष्कळ पापे
३०) घाण
३२) भय, दरारा, इभ्रत
३३) सेवक
३५) रतिचा पती, सुंदर पुरुष
३६) फळांपासून केलेले पेय
३८) आमंत्रण देणे, बोलाविणे
३९) गौरीहर
४१) च्या बरोबर(हिं)
४४) विपत्तीची कहाणी
४५) पत्थर
४६) येणे, येऊन पोहोचणे
४८) तसराळे
४९) राबता, जाणेयेणे
५१) अंगावर येणारा काटा
५३) मौज, एका रागाचे नाव
५६) वितरण
५८) मुलगी
६०) प्राण
६३) अळशी नावाचे धान्य
६४) मोठी जाड तलवार
६५) बाण
६६) भरीवच्या विरुद्ध
६८) मलई
७०) उंदीरासारखा एक प्राणी
७१) संपूर्ण
७२) युद्ध
७३) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
७४) शरीर
७५) ढीग
७८) चेष्टा, टिंगल

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



महासागर



# सरकारी मालाची खुलेआम लूट?

## चांगल्या वस्तूंची भंगारात विक्री; ऐना आरोग्य केंद्रातील धक्कादायक प्रकार





सरकारी दवाखान्याचे सामान विकावे लागत असेल, तर हे शासनाचे अपयश आहे. आम्ही जनतेकडून भिक मागून निधी उभारू, पण हे अन्यायकारक प्रकार थांबले पाहिजेत. दोषींवर कारवाई झाली नाही, तर 'भिक मांगो आंदोलन' करू.

**- शेरू वाघ - जिल्हाध्यक्ष**

ऐना आरोग्य केंद्रात असा कुठलाही अवैध प्रकार घडलेला नाही. याठिकाणी असलेले भंगार साहित्य विक्रीसाठी वरून आदेश आलेले आहेत. याबाबत अधिक चौकशी सुरू आहे.

**- डॉ. श्रीकांत कुलकर्णी, डहाणू तालुका वैद्यकीय अधिकारी**

**डहाणू, दि. ८ : जितेंद्र टोके**

डहाणू तालुक्यातील ऐना प्राथमिक आरोग्य केंद्रात सरकारी संपत्तीची सर्रास लूट उघडकीस आल्यानंतर संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. लोखंडी पलंग, खुर्च्या, कपाटे यासारखे साहित्य केवळ २० रुपये किलोच्या दराने भंगारात विकले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हा प्रकार केवळ आर्थिक अपहार नसून, संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेच्या बेजबाबदार आणि सडलेल्या व्यवस्थेचे प्रतिबिंब आहे, असे स्थानिक नागरिकांचे ठाम मत आहे.

ज्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांकडून रुग्णसेवेची अपेक्षा असते, त्यांनीच सरकारी माल विक्री करण्याचे पाऊल उचलल्याने विश्वासाला तडा गेला आहे. विशेष म्हणजे, या विक्रीला जिल्हा परिषदेचे आदेश असल्याचे समर्थन देत आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी एका व्हायरल व्हिडिओत दिले आहे. मात्र, अशा प्रकारचे आदेश लेखी स्वरूपात आहेत का?, याचा खुलासा अद्याप करण्यात आलेला नाही.

मार्क्सवादी-लेनिनवादी लाल बावटा पक्षाचे कार्यकर्ते प्रदीप सपाटे आणि गणेश सपाटे यांना याची माहिती मिळताच, त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत संपूर्ण प्रकाराचे व्हिडीओ चित्रीकरण केले. संबंधित कर्मचाऱ्यांना "तुम्ही कोणत्या अधिकाराने सरकारी साहित्य विकता?" असा थेट सवाल करून जाब विचारला. त्यामुळे काही कर्मचारी घाबरले आणि तोंड लपवत पळून गेले.

लाल बावटा पक्षाचे जिल्हाध्यक्ष शेरू वाघ यांनी गटविकास अधिकाऱ्यांशी संपर्क साधून वस्तुस्थिती मांडल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करत भंगारात गेलेले साहित्य परत रुग्णालयात आणण्याचे आदेश दिले. मात्र, हे सर्व प्रकार जर एका पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उघडकीस आणले नसते, तर सरकारी माल कायमचा खाजगी हाती गेला असता, हे नाकारता येत नाही. या प्रकाराला "सरकारी लूट" असे संबोधून दोषींवर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी जोरदार मागणी लाल बावटा पक्षाने केली आहे. कारवाई न झाल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही पक्षाने दिला आहे. तसेच, या प्रकाराचा पर्दाफाश करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान पक्षाचे राज्य सचिव ॲड. आदेश बनसोडे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या संपूर्ण घटनेमुळे प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यप्रणालीवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. सरकारी माल खुलेआम भंगारात जात असताना संबंधित निरीक्षक, वैद्यकीय अधिक्षक आणि प्रशासकीय अधिकारी काय करत होते, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. हा प्रकार केवळ एका केंद्रापुरता मर्यादित नसून, इतर ठिकाणीही असे प्रकार घडत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. शासन आणि प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा जनतेचा रोष अनावर होईल आणि त्याची जबाबदारी प्रशासनावरच राहील.

# महापालिकेची काम करताना ठेकेदाराकडून वीज चोरी

## कारवाईसाठी पालिकेने मागवले मार्गदर्शन

**वसई, दि. ८ : प्रतिनिधी**

वसई पूर्वेतील एसटीपी उभारण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेकडून ४७० कोटी रुपयांचं कंत्राट मिळवणाऱ्या एका कंपनीविरुद्ध ३ हजार ६७० रुपयांच्या वीज चोरीप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर हा करार तात्काळ रद्द करावा आणि ईगल इन्फ्रा इंडिया या कंपनीला काळ्या यादीत टाकावे अशी मागणी विविध पक्षांकडून करण्यात आली आहे. सदर प्रकरणी महापालिका प्रशासनाने ॲड. विश्वनाथ पाटील यांच्याकडे कायदेशीर मार्गदर्शन मागवले आहे.



मिनी फीडरमधून परवानगी शिवाय मल: निसारण व भूमिगत गटार खोदण्यासाठी सदर चोरीने वीज घेतली होती. महावितरण अधिकाऱ्यांना याची माहिती मिळाल्यावर ईगल इन्फ्राविरुद्ध २७ मे २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. महापालिका प्रशासनाच्या इतिहासात आतापर्यंत ठेकेदारांना वाचवण्यात अथवा पाठीशी घालण्यात अधिकारी वर्ग प्रयत्नशील असतात. अशा स्वरूपाच्या कारवाईची महापालिका प्रशासनाला कधीच गरज भासू दिली नाही. त्यामुळे याही प्रकरणात ठेकेदाराला झुकते माप देण्याची शक्यता जास्त आहे.

महावितरणने सदर कंत्राटदाराविरोधात गुन्हा दाखल केला असला, तरी महानगरपालिकेने अजूनही कुठलीच कारवाई केलेली नाही. वास्तविक पाहता सदरची निविदा प्रक्रिया रद्द करून ठेकेदाराला काळ्या आधी टाकणे क्रमप्राप्त आहे. सदरची कारवाई पालिका प्रशासन करणार का ? याकडे करदात्या नागरिकांचे लक्ष लागून आहे.

महापालिकेने अजूनही कंत्राटदारावर कारवाई केलेली नाही. तसेच याबाबत कायदेशीर मार्गदर्शन मागवण्यात आलेले आहे. त्यानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

**- दीपक झिंजाड, उपायुक्त, वसई विरार महापालिका**

# नाल्यातील गाळाचा सरकारी जमिनीवर भरावासाठी वापर

## ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**वसई, दि. ८ : प्रतिनिधी**



वसई विरार महापालिकेची पावसाळ्यापूर्वीची नालेसफाई करणाऱ्या ठेकेदाराने नाल्यातुन काढलेला गाळ सरकारी जमिनीवर भरावासाठी विनापरवाना टाकत आहेत. नागरी वस्ती लगत असलेल्या सरकारी जमिनीवर नाल्यातील दुर्गंधीयुक्त गाळ विनापरवाना टाकणाऱ्या ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी भारतीय जनता पार्टी वसई रोड मंडळ एससी मोर्चा अध्यक्ष अर्जुन इंगोले यांनी तहसीलदार वसई यांच्याकडे केली आहे

वसई विरार शहर पालिकेची पावसाळ्यापूर्वीची नाले सफाई ठेकेदारामार्फत सुरू आहे. वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच मधील दिवाणमान येथील सुरू असलेल्या नालेसफाईतील दुर्गंधीयुक्त गाळ ठेकेदाराने सनसिटी येथील टेम्पो स्टँडच्या मागील बाजूस दुर्गंधीयुक्त गाळ टाकून सरकारी जागेत बेकायदेशीरपणे भराव सुरू आहे. नाल्यातून काढलेला दुर्गंधीयुक्त गाळ सरकारी जागेवर टाकण्यासाठी ठेकेदाराने महसूल विभागाकडून कोणतीही परवानगी घेतलेली नाही, अशी तक्रार इंगोले यांनी केली आहे.

सदर जागेशेजारी नागरी वस्ती आहे. त्यामुळे सदर सरकारी सर्वे नंबर 176 या जागेवर टाकण्यात आलेल्या दुर्गंधीयुक्त गाळामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. गाव मौजे दिवाणमान येथील सर्वे नंबर 176 या सरकारी जागेत विनापरवाना नाल्यातील दुर्गंधीयुक्त गाळ टाकणाऱ्या ठेकेदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी अर्जुन इंगोले यांनी तहसीलदार वसई यांच्याकडे लेखी तक्रार देऊन केली असून तहसीलदार वसई यांनी देखील तात्काळ चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

# घोडबंदर गावात बनावट नोटांचा कारखाना

# दोघांना अटक

**भाईंदर, दि. ८ : प्रतिनिधी**

घोडबंदर गावातील एका चाळीत बनावट नोटा तयार करून त्या मीरा भाईंदर परिसरात वितरित करणाऱ्या दोन जणांना काशिगाव पोलिसांनी अटक केली आहे. सुपर्णा मन्ना आणि सुर्यदेब गयेना अशी त्यांची नावे आहेत. कारवाईत पोलिसांनी बनावट नोटा बनवण्याची यंत्र सामुग्री आणि एक लाख रुपयांचा बनावट नोटा जप्त केल्या आहेत.

मिरा रोडच्या जेपी नॉर्थ इमारतीच्या मागच्या बाजूला असणाऱ्या रस्त्यावर बनावट तयार केलेल्या नोटा वितरीत करण्यासाठी काही जण येणार असल्याची माहिती काशिगाव पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार, पोलिसांच्या पथकाने लावला होता. यावेळी बनावट नोटा चलनात आणण्याच्या प्रयत्नात असलेल्या सुपर्णा आणि सूर्यदेब यांना ताब्यात घेण्यात आले. यावेळी त्यांच्याकडे ५०० रुपयांच्या २६ बनावट नोटा आढळून आल्या.

दोघांच्या अटकेनंतर आरोपींनी दिलेल्या माहितीवरून काशिगाव पोलिसांनी घोडबंदर गावातील तरे चाळीतील एका घरात छापा मारला. यावेळी आरोपींच्या घरात बनावट नोटा तयार करण्यासाठी लागणारे साहित्य पोलिसांच्या हाती लागले. दोन्ही आरोपी मूळचे बंगालमधील रहिवाशी असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित लांडे यांनी दिली.

# 500 घरकाम करणाऱ्या महिलांना श्रमिक हक्क व न्याय मिळण्यासाठी पंतप्रधान यांना पाठवले पोस्टकार्ड

**उल्हासनगर, दि. ८ : प्रतिनिधी**

पंतप्रधान भारत सरकार यांना श्रमिक म्हणून हक्क व न्याय मिळावे यासाठी उल्हासनगरातील ५०० घरकाम करणाऱ्या महिलांद्वारे पोस्टकार्ड लिहून आपली व्यथा मांडली आहे.

महामाया असंघटीत कामगार संघटनेच्या माध्यमातुन पंतप्रधान मोदी यांना पाठवलेल्या पोष्ट कार्ड मध्ये महिलानी लिहिले आहे की , मी घरेलू काम करते. मी करत असलेल्या कामामुळे आज लाखोच्या संख्येने महिलांना रोजगारासाठी घरा बाहेर पडणे शक्य झाले आहे. समाजाच्या गरजेचे आवश्यक श्रम मी करते परंतु मला श्रमिक म्हणून कुठलाही अधिकार नाही. सामाजिक सुरक्षा अधिकार नाही . या परिस्थितीची नोंद सर्वोच्च न्यायालयाने २९ जानेवारी २०२५ रोजी घरेलू कामगारांच्या एका फौजदारी स्वरूपाच्या केस नं.८७७७/२०२२ मध्ये घेतली असुन घरेलू कामगारांचे होणारे शोषण संपविण्याकरता व सामाजिक सुरक्षा अधिकार देऊन सन्मानपूर्वक जगण्याच्या अधिकारा करता देशपातळीवरील कायदा घरेलू कामगारांकरता सहा महिन्यात तयार करावा असा आदेश आपल्या केंद्र सरकारला दिला आहे. परंतु अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही. तरी आपण या बाबत त्वरित हस्तक्षेप करावा व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करून देशातील लाखो घरेलु कामगारांना न्याय द्यावा अश्या विनंतीचे ५०० पोस्टकार्ड घर कामगार महिलां कडून महामाया असंगठित कामगार संघटना अध्यक्षा मीरा सपकाळे यांचे मार्गदर्शना खाली पाठवले आहेत.

# बेकायदा रेती उत्खननावर कारवाई

**मनोर, दि. ८ : प्रतिनिधी**



वसई आणि पालघर तालुक्याच्या सीमा भागात वैतरणा खाडीकिनारी सुरु असलेल्या अनधिकृत रेती उतखनना विरोधात महसूल विभागाकडून धडक कारवाई करण्यात आली आहे. वसई तालुक्यातील चिमणे आणि पालघर तालुक्यातील उंबरपाड्याच्या हद्दीतील रेती साठवणूक केलेल्या कुंड्या जेसीबी मशीनच्या साहाय्याने तोडण्यात आले. महसूल विभागाच्या धडक कारवाईमुळे रेती माफियांचे धाबे दनाणले आहे. गुरुवारी रात्री कारवाई करण्यात आली आहे

वसई आणि पालघर तालुक्याच्या सीमा भागात वैतरणा खाडीतून रेती उतखनन सुरु असल्याची माहिती खानिवडे तलाठी सजेचे तलाठी नितीन सुर्वे यांना मिळाली होती. तलाठी सजेचा कार्यभार स्वीकारल्यानंतर उंबरपाडा आणि चिमणे गावाच्या हद्दीत जाऊन पाहणी केली असता खाडी किनारी रेतीच्या कुंड्यामध्ये रेतीची साठवणूक केलेली आढळून आली. कुंड्या आणि रेती आणि जेसीबी मशीनच्या सहायाने नष्ट करण्यात आल्या. कारवाईत सुमारे २५ ब्रास रेती खाडी पात्रात ढकलून नष्ट करण्यात आली.

वसई तालुक्यातील महामार्गालगतच्या खानिवडे तलाठी सजा क्षेत्राचा कार्यभार हाती घेतलेले ग्राम महसूल अधिकारी नितीन सुर्वे यांनी वसई तहसीलदार अविनाश कोष्टी यांच्या मार्गदर्शनात कारवाई करण्यात आली आहे.

# पालघर जिल्ह्यात ईद उत्साहात साजरी



**पालघर, दि. ८ : प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील विविध भागात बकरी ईद उत्साहाने साजरी करण्यात आली. सकाळी मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज पठण केले. त्यानंतर एकमेकांना आलिंगन देत ईद मुबारक म्हणत शुभेच्छा दिला. मीरा भाईंदरसह वसई, पालघर, डहाणू, वाडा, तलासरी, जव्हार, मोखाडा आदी तालुक्यातील मुस्लिमबहुल भाग असलेल्या ठिकाणी ईद मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

# महिलेची फसवणूक करून शारीरिक अत्याचार; आरोपी डॉक्टरला अटक

**वसई, दि. ८ : प्रतिनिधी**

कामाच्या निमित्ताने जवळीक साधून महिलेसोबत जबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित करणाऱ्या तसेच लग्नाचे आमिष दाखवून फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यावरून वाद उद्भवल्यावर महिलेला मारहाण करणाऱ्या विवाहित डॉक्टरला नालासोपारा पोलिसांनी कांदिवली, मुंबई येथून शनिवारी अटक केली आहे.बहादुर उर्फ विजय जगनारायण सिंग (५२), रा. कांदिवली) असे अटक आरोपी डॉक्टरचे नाव आहे. हा डॉक्टर पीडित महिलेला 'शिवानी मूव्ही इंटरनॅशनल' या चॅनेलच्या अल्बमसाठी निमित्त साधून जवळीक साधत होता. आपल्या पत्नीसोबत वाद असून तिला घटस्फोट देणार असल्याचे त्याने पिडीत महिलेला सांगून सहानुभूती मिळवली होती. यानंतर विरार पश्चिमेकडील एका हॉटेलमध्ये तिच्यावर अतिप्रसंग केला होता. लग्नाचे अमिष देऊन पीडित महिलेच्या निवासस्थानी अनेकदा तिच्यावर शारीरिक अत्याचार केले होते. यानंतर पीडीत महिलेच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाणही केली होती.

या मारहाणीत तिचे कात्रीने केस कापून तिला विद्रूप बनवल्याची तक्रार नालासोपारा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा क्र. २८१/२०२५ नुसार पोलिसांनी आरोपीस अटक केली. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद कदम करीत आहेत.

# महावितरणचा 20वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

## कर्मचाऱ्यांसह कुटुंबियांचा उत्स्फुर्त सहभाग




**कल्याण, दि. ८ : प्रतिनिधी**

महावितरणच्या कल्याण परिमंडलात महावितरणचा २० वा वर्धापन दिन शुक्रवारी (०६ जून) सायंकाळी उत्साहात साजरा झाला. नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचारी, अभियंते, अधिकारी व त्यांच्या कुटुंबियांनी या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धापन दिनानिमित्त एक ते सहा जून दरम्यान कर्मचारी व ग्राहक केंद्रस्थानी ठेवत वीज वितरित करताना व ती वापरताना घ्यावयाच्या खबरदारीबाबत विविध माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात आली.

महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त 'शुन्य अपघात महावितरण, शुन्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन कल्याण परिमंडलात एक ते सहा जून दरम्यान वीज सुरक्षा सप्ताह उत्स्फुर्तपणे साजरा झाला. या सप्ताहात अधिकारी-कर्मचाऱ्यांमार्फत मॅरेथॉन, रॅली, चित्रकला व निबंध स्पर्धा, रहिवाशी सोसायट्यांना भेटी अशा विविध माध्यमातून वीज सुरक्षेबाबत कल्याण एक व दोन, वसई, पालघर या चारही मंडलामंध्ये व्यापक जनजागृती करण्यात आली. सप्ताहाचा समारोप व महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त शुक्रवारी कर्मचारी व कुटुंबियांसाठी मनोरंजनाच्या कार्यक्रमांचे आयोजन कल्याण, पालघर व वसईमध्ये करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महावितरणच्या २० वर्षातील वाटचालीचा आढावा घेणाऱ्या तसेच मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस व व्यवस्थपकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या शुभेच्छा व वीज सुरक्षेबाबत घ्यावयाच्या काळजीबाबत मुख्य कार्यालयाकडून देण्यात आलेल्या चित्रफिती दाखवण्यात आल्या. कोकण प्रादेशिक विभाग, कल्याण परिमंडल, कल्याण एक आणि दोन तसेच कल्याण स्थापत्य मंडलांतर्गत कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी कल्याण पश्चिमेतील आचार्य अत्रे नाट्यमंदिरात लेखक व दिग्दर्शक संतोष पवार यांच्या 'हीच खरी फॅमिलीची गंमत आहे' या नाटकाचा प्रयोग झाला. सागर कारंडे, हर्षदा कर्वे, प्रतिक पाध्ये, विनिशा कुलकर्णी, राकेश शालिनी, संतोष पवार व शलाका पवार अभिनीत या व्यावसायिक नाटकाच्या सादरीकरणाने निखळ मनोरंजनासह कौटुंबिक आचरणाच्या मुल्यांबाबत उपस्थितांना अंतर्मुख होण्यास भाग पाडले. तर वसई आणि पालघर मंडल कार्यालयांच्या वतीनेही कर्मचारी व कुटुंबियांसाठी निखळ मनोरंजनाच्या कार्यक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

# जिल्हा परिषदेमध्ये शिवराज्याभिषेक दिन साजरा

**पालघर, दि. ८ : प्रतिनिधी**



जिल्हा परिषद पालघर येथे शिवराज्यभिषेक दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराजवळ शिवछत्रपतींच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, प्रकल्प संचालक डॉ.रूपाली सातपुते, तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते स्वराज्य गुढी उभारण्यात आली.

गुरुवारी झालेल्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शुक्रवारी वृक्षारोपण करण्यात आले. जननायक बिरसा मुंडा सभागृहात दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा औपचारिक शुभारंभ झाला. राष्ट्रगीत व राज्य गीत गाण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी आपल्या मनोगतातून शिवराज्याभिषेक दिनाचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करत, छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श प्रशासन व स्वराज्य संकल्पना आजही किती समर्पक आहे यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमात जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर आणि शिक्षकांनी विचारप्रवर्तक व्याख्यान सादर केले. रणवीर या विद्यार्थ्याने दमदार पोवाडा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) इजाज अहमद शरक मसलत यांच्या आयोजनाने हा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी चंद्रशेखर जगताप, मुख्य लेखा वित्त अधिकारी धनराज पांडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी व्यंकटराव हुंडेकर यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मणिपूरमध्ये गोंधळ! निदर्शकांचा आत्मदहनाचा प्रयत्न

**इम्फाळ, दि. ८ वृत्तसंस्था**

मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उफाळून आला आहे. शनिवारी अनेक जिल्ह्यांमध्ये हिंसाचार उसळला, त्यानंतर प्रशासनाने बिष्णुपूर जिल्ह्यात कर्फ्यू लागू केला आणि पाच जिल्ह्यांमध्ये इंटरनेटवर बंदी घातली.

शनिवारी रात्री मेतेई संघटनेच्या नेत्या अरामबाई टेंगोल आणि इतर अनेक नेत्यांना पोलिसांनी अटक केल्यानंतर हिंसाचार सुरू झाला. निदर्शकांनी रस्त्यांवर आग लावली, बसेस जाळल्या, मालमत्तेची तोडफोड केली. त्यानंतर हिंसक संघर्ष सुरू झाला.

आंदोलकांनी प्रशासनाला स्वतःवर पेट्रोल ओतून आत्मदहन करण्याची धमकी दिली. याचा एक व्हिडिओही समोर आला आहे, यामध्ये अनेक आंदोलक उभे राहून स्वतःवर पेट्रोल ओतत असल्याचे दिसत आहे.



शनिवारी रात्री उशिरा अरंबाई टेंगगोल यांना अटक केल्यानंतर इम्फाळ पूर्व आणि पश्चिम जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली. त्यानंतर, राजधानी इम्फाळच्या अनेक भागात निदर्शकांचे पोलिसांशी संघर्ष झाला. इम्फाळच्या खुराई लामलोंग भागात, निदर्शकांच्या संतप्त जमावाने बस जाळल्या, टायर जाळून रस्ते अडवले आणि सुरक्षा दलांशी संघर्ष केला.

निदर्शक इथेच थांबले नाहीत तर ते इंफाळ विमानतळाच्या तुलिहाल गेटबाहेर जमले. निदर्शकांनी रात्री विमानतळ रस्त्यावरील वाहतूक रोखली त्यांनी तिथेच रात्र काढली.

राजधानीत वाढत्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी बळाचा वापर केला आणि अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. यादरम्यान, लाठीचार्जमध्ये जखमी झालेल्या एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर, बिष्णुपूर जिल्ह्यात संपूर्ण संचारबंदी लागू करण्यात आली आहे. तर इंफाळ पूर्व, इंफाळ पश्चिम, थौबल आणि काकचिंगमध्ये पाचपेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली आहे.

# पाकिस्तानातील मदरशांमध्ये अल्पवयीन मुलांवर बलात्कार

**इस्लामाबाद, दि. ८ वृत्तसंस्था**

पाकिस्तानातील मदरशांमध्ये मोफत धार्मिक शिकवण देण्याच्या नावाखाली हजारो अल्पवयीन मुलांवर मौलवींनीच बलात्कार केल्याचे समोर आले आहे. फ्रेंच मीडिया हाऊस 'फ्रान्स 24'च्या माहितीपटातून या भयानक सत्याचा खुलासा झाला आहे.

या माहितीपटात पाकिस्तानातील मदरशांमध्ये शिकणाऱ्या मुलांनी त्यांच्यासोबत घडलेल्या प्रत्येक घटनेचे तपशीलवार वर्णन केले आहे. मुलांनी सांगितले की इस्लामिक शिक्षण देण्याची जबाबदारी असलेले मौलवी त्यांच्यावर बलात्कार करतात.

जरी या शाळा (मदरसे) सामान्य पार्श्वभूमी असणाऱ्या मुलांना मोफत धार्मिक आणि इस्लामिक शिकवणी देण्याचा दावा करत असल्या तरी, येथे त्यांच्या लैंगिक छळाची आणि लैंगिक हिंसाचाराची एक पद्धतशीर संस्कृती विकसित झाली आहे, असे या माहितीपटात म्हटले आहे.

या माहितीपटामुळे जगभरात खळबळ माजली असून दहशतवादी कारवायांना पाठिंबा आणि दहशतवाद्यांना पोसल्यामुळे आधीच जगभरात नाचक्की झालेल्या पाकिस्तानची जागतिक स्तरावर होती नव्हती तेवढी लाजही गेली आहे.

'फ्रान्स 24'च्या रिपोर्टमध्ये अनेक साक्षीदारांच्या अनुभवाचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यात मुलांनी सांगितेल आहे की, ज्या धर्मगुरूंनी त्यांना धार्मिक मूल्ये शिकवायची होती त्यांनीच त्यांच्यावर बलात्कार केला. वारंवार लैंगिक छळ केला.

गावातील सर्व मुले मदरशांमध्ये बलात्कार होण्याच्या धोक्याबद्दल बोलत होती. मला वाटले नव्हते की माझ्यासोबत असे काही घडेल असे 14 वर्षीय हसन या पीडित मुलाने सांगितले. त्या मुलाने त्याच्यावर मुल्लाने कसा बलात्कार केला तेच सांगितले आहे.

'फ्रान्स 24' या चॅनेलने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये हसन याने सांगितले आहे की, त्याच्या मदरशाच्या मुख्याध्यापकाने त्याला घर स्वच्छ करण्याच्या बहाण्याने त्याच्या घरी नेले. मी त्याच्या मोटरसायकलवर बसलो आणि आम्ही त्याच्या घरी निघालो. घरी पोहचताच तो खोलीत आला, त्याने दार बंद केले. त्यांनी मला खाली पाडले. माझी पँट बळजबरीने काढून टाकली. आणि मग त्याने माझ्याशी भयानक कृत्ये केली. मला रडू आवरत नव्हते, पण त्याने माझे काहीही ऐकले नाही," अशी आपबिती त्या मुलाने सांगितली आहे.

याशिवाय, एका मदरशात शिकणाऱ्या आणखी एका विद्यार्थ्याने सांगितले की, "मी बऱ्याच काळापासून शिक्षकांचा हा प्रकार पाहत आहे. एकदा मी पाहिले की खोलीची खिडकी उघडी होती आणि शिक्षक कपडे काढून एका मुलावर झोपले होते.

म्हणून मी विचार केला की जर मदरशांमध्ये असे घडत असेल तर ते योग्यच असेल, म्हणून मी इतर मुलांसोबतही ते करायला सुरुवात केली. मग जेव्हा मी मदरशातून बाहेर पडलो आणि घरी पोहोचलो तेव्हा मी घरीही तेच करायला सुरुवात केली. नंतर मला कळले की हे सर्व करणे चुकीचे आहे."

# सोनिया गांधी शिमला येथील रुग्णालयात दाखल, उपचार सुरू



**शिमला, दि. ८ वृत्तसंस्था**

काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी या शिमला या ठिकाणी आजारी झाल्या. ज्यानंतर त्यांना इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज आणि रुग्णालय शिमला या ठिकाणी दाखल करण्यात आलं आहे. त्यांना प्रकृतीचा थोडा त्रास जाणवू लागला. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. सध्या त्या उपचारांना प्रतिसाद देत असून त्यांची प्रकृती स्थिर आहे अशी माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

सोनिया गांधी शिमला दौऱ्यावर असताना त्यांची प्रकृती अचानाक बिघडली. ज्यानंतर त्यांना शिमला येथील इंदिरा गांधी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार त्या ठिकाणी त्यांच्या काही वैद्यकीय तपासण्याही करण्यात आल्या. सोनिया गांधींची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल केलं आहे. मात्र आता त्यांची प्रकृती स्थिर आहे अशी माहिती हिमाचलचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू यांचे सचिव नरेश चौहान यांनी माध्यमांना दिली आहे.

सोनिया गांधी या त्यांची कन्या प्रियांका गांधी यांच्या घरी थांबल्या होत्या. सकाळी त्यांची प्रकृती थोडी बिघडली. ज्यानंतर काही वेळाने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. सोनिया गांधी या ७८ वर्षांच्या आहेत. त्यांचं वय लक्षात घेऊन त्यांच्या नियमितपणे वैद्यकीय चाचण्या केल्या जातात. सोनिया गांधी मागच्या रविवारी शिमला या ठिकाणी आल्या होत्या. त्यानंतर आता त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

# 70 वर्ष 'लिव्ह-इन'मध्ये राहिल्यानंतर जोडप्याने बांधली लग्नगाठ

**डुंगरपूर, दि. ८ वृत्तसंस्था**

राजस्थानमधील एका जोडप्याने तब्बल ७० वर्षे लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर लग्न केले आहे. या जोडप्याला सोशल मीडियावर प्रंचड लोकप्रियता मिळताना पाहायला मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजस्थानच्या डुंगरपूर जिल्ह्यातील गालंदर या एका आदिवासी गावातील राम भाई खरारी (९५) आणि जीवाली देवी (९०) असे या लग्नगाठ बांधलेल्या दोघांची नावे आहेत. विशेष म्हणजे या दोघांनी लग्न केले नसले तरी त्यांना आठ मुले आणि अनेक नातवंडे आहेत. मात्र सात दशके एकत्र राहिल्यानंतर या दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला आणि विशेष म्हणजे या निर्णयाला त्यांच्या मुलांनी देखील पूर्ण पाठिंबा दर्शवला.

त्यांनी लग्न करण्याची इच्छा दाखवली आणि संपूर्ण कुटुंबाने निर्णय घेतला की आपण हे करूयात. गावातील मोठ्या लोकांचा देखील सल्ला घेण्यात आला आणि १ जून रोजी हळदीचा कार्यक्रम पार पडला. संपूर्ण गावाच्या उपस्थितीत लग्नसोहळा ४ जून रोजी संपन्न झाला, असे या जोडप्याचा मुलागा कांती लाल खरारी यांनी एनडीटीव्हीशी बोलताना सांगितले. "ते आनंदी आहेत आणि आम्ही देखील आनंदी



आहोत," असेही खरारी यांनी पुढे बोलताना सांगितले.

लग्नाच्या आधी काढल्या जाणारी मिरवणूक ज्याला बांदोली देखील म्हणतात यामध्ये डीजे संगीत लावण्यात आले होते, ज्याच्या तालावर गावकऱ्यांना डान्स केला, या मिरवणुकीत या जोडप्याची मुले देखील सहभागी झाली होती. सर्वांच्या उपस्थितीत जोडप्याने सात फेरे घेतले आणि सर्व गावकऱ्यांना जेवण देण्यात आले.

हे जोडपे राजस्थानमधील आदिवासी भागाचे वैशिष्ट्य असलेल्या नाता परंपरेनुसार एकत्र राहत होते. या प्रथेनुसार, कोणताही आदिवासी पुरुष किंवा महिला लग्न न करता त्यांच्या आवडीच्या दुसऱ्या व्यक्तीबरोबर राहू शकतो.

तसेच अशा नात्यातून जन्माला येणाऱ्या मुलांना पुरूषाच्या सर्व प्रकारच्या मालमत्तेवर अधिकार असतो. मात्र विवाहित नसल्यामुळे काही निर्बंध पाहायला मिळतात. हे निर्बंध विशेषतः सामाजिक कार्यक्रमांमध्ये असतात. जसे की महिलांना त्यांच्या मुलांच्या लग्न समारंभात, हळदी कार्यक्रमात, नवऱ्यामुलाचे स्वागत करताना त्यामध्ये सहभागी होण्याची परवानगी नसते.

# कोलंबियात राष्ट्राध्यक्ष पदाच्या उमेदवारावर प्रचार सभेत भाषण करताना गोळीबार

**कोलंबिया, दि. ८ वृत्तसंस्था**

कोलंबियाचे सिनेटर मिगुएल उरिबे यांच्यावर शनिवारी बोगोटा येथे एका प्रचार सभेदरम्यान गोळीबार करण्यात आल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी याबद्दल माहिती दिली आहे. उरिबे हे २०२६ ची राष्ट्राध्यक्ष पदाची निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. दरम्यान उरिबे यांच्या प्रकृतीबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. मात्र दवाखान्यात दाखल करण्यात आलेल्या ३९ वर्षीय उरिबे यांची प्रकृती नाजूक असल्याचे सांगितले जात आहे.

उरिबे हे कोलंबियाचे माजी अध्यक्ष अल्वारो उरिबे यांनी स्थापन केलेल्या विरोधी कंझर्व्हेटिव्ह डेमोक्रॅटिक सेंटर पक्षाचे सदस्य आहे. रक्ताने माखलेल्या उरिबे यांचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये त्यांच्या डोक्याला जखम झालेली दिसून येत आहे.

फोन्टिबोन जिल्ह्यात त्यांच्यावर गोळीबार झाल्यानंतर उरिबे यांना आपत्कालीन आरोग्य सेवा दिली जात आहे अशी माहिती बगोटाचे मेयर कार्लोस गॅलन यांनी दिली. जर त्यांना दुसरीकडे हलवाण्याची गरज भासली तर त्यासाठी संपूर्ण हॉस्पीटल नेटवर्क अलर्टवर असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी हल्लेखोराला अटक करण्यात आल्याचे देखील यावेळी स्पष्ट केले.

कोलंबियन सरकारने या हल्ल्याचा निषेध करत एक निवेदन जारी केले आहे, तर कोलंबियन अध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी एक्सवर पोस्ट करत सेनेटर उरिबे यांच्या कुटुंबियांप्रती सद्भावना व्यक्त केल्या आहेत. ते म्हणाले की, "तुमच्या वेदना कशा कमी कराव्या मला माहिती नाही. हे एका हरवलेल्या आईचे आणि जखमी मातृभूमीचे दुःख आहे."

उरिबे यांच्या डेमोक्रॅटीक सेंटर पार्टीनुसार, शनिवारी बोगोटामधील फोन्टिबोन भागात सिनेटर उरिबे हे एक प्रचारसभेत बोलत होते तेव्हा एका शस्त्रधारी व्यक्तीने त्यांना मागून गोळ्या घातल्या.

# कन्व्हर्जिंट इंडियातर्फे नवी मुंबईतील उलवे पीएम श्री स्कूलच्या सुरक्षा सुविधेत वाढ

कन्व्हर्जिंट या सिस्टम इंटिग्रेशन क्षेत्रातील सेवांवर काम करणाऱ्या जागतिक स्तरावरील आघाडीच्या कंपनी तर्फे समाजाला सक्षम करण्याच्या त्यांच्या वचनबध्दतेला अनुसरुन त्यांच्या सिग्नेचर असलेल्या स्टेप (सिक्युअर, ट्रान्सफॉर्म, एम्पावर, पार्टनर) अप स्कूल प्रोग्राम चे आयोजन नवी मुंबई येथील उलवे येथे असलेल्या पीएम श्री स्कूल मध्ये करण्यात आले होते. शैक्षणिक वातावरण आणि सुरक्षेत वाढ करण्यासाठी कमी संसाधने असलेल्या शैक्षणिक संस्थांना मदत करण्यासाठी डिझाईन करण्यात आलेल्या या प्रकल्पा अंतर्गत कन्व्हर्जिंट सिस्टम च्या ४० हून अधिक सहका-यांनी त्याचा वेळ आणि कुशलता स्वयंसेवक म्हणून काम करुन शाळेला महत्त्वपूर्ण सुविधा




**लोकार्थ**

आणि तंत्रज्ञान उपलब्ध करुन दिले.

या प्रकल्पाचा एक भाग म्हणून शाळेच्या सध्या उपलब्ध असलेल्या व्हिडिओ सुरक्षा उपकरणांमध्ये वाढ करुन पाच नवीन कॅमेरे बसवण्यात आले यामुळे शाळेच्या परिसरातील सुरक्षा अधिक सक्षम बनली. त्याच बरोबर चमूने शिक्षणाशी संबंधित गरजेच्या असलेल्या काही महत्त्वपूर्ण गोष्टी जसे कोल्ड स्टोअरेज साठी रेफ्रिजरेटर, पुस्तकांसाठीची दोन शेल्फ्स, दोन नोटीस बोर्ड्स आणि एक वायफाय राऊटर दिला ज्यामुळे शाळेतील वर्गांचे परिचालन अधिक चांगले होऊ शकेल.कन्व्हर्जिंट इंडियाच्या डेटा सेंटर्स चे सर्व्हिस डिलिव्हरी मॅनेजर संदीप कुमार यांनी या प्रकल्पाचे नेतृत्व केले ते म्हणाले " आमच्या स्टेप अप स्कूल उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही केवळ तंत्रज्ञानच देत नाही तर दीर्घकालीन आणि सकारात्मक बदल घडवत असतो. पीएम श्री स्कूल मध्ये सर्वसमावेशक आणि सर्वंकश शिक्षणासाठी प्रयत्न करत आहोत आणि यामुळे त्यांना अधिक सुरक्षित तसेच भविष्यात मुलांना आणि शिक्षकांना शैक्षणिक वातावरण अधिक चांगले करण्यास मदत करत आहोत."

# महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील 100 अंगणवाड्यांचा कायापलट केला जाणार



सर्वसमावेशक ग्रामीण विकासाच्या दिशेने लक्षणीय पाऊल पुढे टाकत अनिल अगरवाल फाउंडेशनचा प्रमुख उपक्रम नंदघरने गडचिरोलीच्या जिल्हा परिषदेसह सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. या कराराअंतर्गत महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील १०० अंगणवाड्यांचे आधुनिक नंदघरात रुपांतर केले जाणार आहे. या भागिदारीला महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुहूर्त स्वरूप देत सर्वात वंचित भागात विकास करण्याची राज्याची बांधिलकी दर्शवण्यात आली.

महिला आणि बालविकास विभाग, महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने हा उपक्रम सहा वर्षाखालील ३९०० मुले व १७०० स्त्रिया आणि मुलींच्या आयुष्यावर थेट परिणाम घडवून आणेल. आधुनिक केंद्रांद्वारे प्राथमिक शिक्षण, पोषक आहार, प्राथमिक आरोग्यसेवा आणि कौशल्य विकास तसेच समग्र विकासाच्या संधी पुरवल्या जातील. हा प्रकल्प महाराष्ट्राच्या आदिवासी भागातील विकासाची दरी नाविन्य आणि सर्वसमावेशक भागिदारीद्वारे सांधण्याची बांधिलकी दर्शवणारा आहे. ठाणे येथील २५ अंगणवाड्यांचे नंदघरात रुपांतर करण्यात आले असून त्याला मिळालेल्या यशाच्या पायावर ही भागिदारी आधारित असून ती भारताच्या इंटिग्रेटेड चाइल्ड डेव्हलपमेंट सर्व्हिसेस (आयसीडीएस) आणि पोषण २.० प्रकल्पांशी सुसंगत आहे.

# एसीजीच्या सहकार्याने व्यावसायिक बास्केटबॉल लीगचे आयोजन

भारतीय खेळांसाठी एक परिवर्तनीय क्षण म्हणून, एसीजी स्पोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेडने बास्केटबॉल फेडरेशन ऑफ इंडिया (BFI) च्या सहकार्याने भारतातील पहिली व्यावसायिक बास्केटबॉल लीग सुरू करण्याची घोषणा केली आहे. या अभूतपूर्व उपक्रमात पुरुष आणि महिला दोघांसाठी ५ बाय ५ (फाईव्हसाईड-प्रत्येकी पाच खेळाडू) आणि ३ बाय ३ (थ्रीअसाईड प्रत्येकी तीन खेळाडू) असेल. या स्वरूपातील संरचित स्पर्धात्मक लीग, ज्यामुळे देशभरातील खेळाडूंना बास्केटबॉल मध्ये व्यवहार्य करिअर म्हणून कसे खेळायचे, अनुभवायचे आणि समर्थित करायचे याविषयी अधिक माहिती मिळणार आहे.

भारतात हा खेळ कसा खेळला जातो, अनुभवला जातो आणि समर्थित केला जातो हे पुन्हा परिभाषित करण्यासाठी डिझाईन केलेले, लीग बास्केटबॉलला एका विशिष्ट शाखेतून मुख्य प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जागतिक बास्केटबॉल मंचावर भारताच्या उपस्थितीसाठी ही व्यावसायिक लीग दीर्घकालीन उत्प्रेरक म्हणून काम



करेल, ज्याला जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा, समग्र खेळाडू विकास आणि मजबूत समुदाय सहभाग यांचा पाठिंबा असणार आहे. एसीजी स्पोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड द्वारे लीग चालवली जात आहे. एसीजीचा एक विभाग, जो फार्मास्युटिकल आणि न्यूट्रास्युटिकल उद्योगांसाठी एकात्मिक उत्पादन उपायांमध्ये जागतिक स्तरावर आघाडीवर आहे. सामाजिक प्रगतीसाठी एसीजीच्या खोलवर रुजलेल्या वचनबद्धतेचा फायदा घेत, हा उपक्रम तळागाळातील बास्केटबॉल नैपुण्यशोध व विकास कार्यक्रमांमध्ये त्यांच्या दशकभराच्या गुंतवणुकीचा नैसर्गिक विस्तार दर्शवितो.

# विक्रम सोलरला आयपीओसाठी सेबीची मान्यता

३१ मार्च २०२४ पर्यंत उद्योगात १५ वर्षांपेक्षा जास्त अनुभव असलेल्या, स्थापित क्षमतेच्या बाबतीत भारतातील सर्वात मोठ्या सोलर फोटो-व्होल्टेइक ("पीव्ही") मॉड्यूल उत्पादकांपैकी एक असलेल्या विक्रम सोलर लिमिटेडला भांडवली बाजार नियामक, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) कडून प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (आयपीओ) द्वारे निधी उभारण्यासाठी अंतिम निरीक्षण मिळाले आहे.प्रति इक्विटी शेअर १० रुपये दर्शनी मूल्य असलेला आयपीओ १,५०० कोटी रुपयांपर्यंतच्या नवीन शेअर्सच्या इश्यू आणि प्रमोटर आणि प्रमोटर ग्रुप सेलिंग शेअरहोल्डर्सद्वारे १७.४५ दशलक्ष इक्विटी शेअर्सच्या ऑफर फॉर सेल (ओएफएस) चे मिश्रण आहे.कंपनी नवीन जारी केलेल्या रकमेतून रु. ७९३.३६ कोटी रुपये च्या मर्यादेपर्यंत निव्वळ उत्पन्नाचा वापर करण्याचा मानस करते. प्रकल्पाच्या ठिकाणी एकात्मिक ३,००० मेगावॅट सोलर सेल आणि ३,००० मेगावॅट सोलर मॉड्यूल उत्पादन सुविधा उभारण्यासाठी, त्यांच्या पूर्ण मालकीच्या उपकंपनी, व्हीएसएल ग्रीन पॉवर प्रायव्हेट लिमिटेडमध्ये गुंतवणूक करून भांडवली खर्चाच्या अंशतः निधीसाठी हा आयपी असेल.


संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# दहशतवादी आणि पीडित एकाच तराजूत नाहीच - जयशंकर

**नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था**

पहलगाम हल्ल्यानंतर भारत सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर भूमिका घेतली आहे. आधी भारतीय सैन्याने पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट केले. त्यानंतर सरकार विविध देशात जाऊन पाकिस्तानचा खरा चेहरा जगासमोर आणत आहे. या पार्श्वभूमीवर परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी ब्रिटिश परराष्ट्र सचिव डेव्हिड लॅमी यांच्याशी झालेल्या बैठकीत म्हणाले की, भारत कधीही दहशतवादी आणि पीडितांना एक माणणार नाही.

गेल्या महिन्यात भारत आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या ४ दिवसांच्या लष्करी संघर्षानंतर अनेक देशांनी भारत आणि पाकिस्तानला पुन्हा एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. अशा परिस्थितीत डॉ. एस जयशंकर यांचे हे विधान महत्वाचे ठरते.



ब्रिटिश परराष्ट्र सचिव लॅमी काल सकाळी दिल्लीत पोहोचले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. बैठकीनंतर परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, ब्रिटिश परराष्ट्रमंत्र्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला, तर पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानवर आंतरराष्ट्रीय कारवाईची गरज असल्याचे म्हटले. तसेच, सीमापार दहशतवादाविरुद्धच्या भारताच्या लढाईत ब्रिटनने दिलेल्या पाठिंब्याचे मी कौतुकही केले.

परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, पंतप्रधान मोदींनी भारत-ब्रिटन मुक्त व्यापार करार आणि दोन्ही देशांमधील दुहेरी योगदान करार (डीसीसी) च्या अलिकडच्या निष्कर्षाला "रणनीतिक टप्पा" म्हटले आहे. यामुळे विविध क्षेत्रात भागीदारीच्या शक्यता उघडतील. पंतप्रधान मोदींनी ब्रिटिश समकक्ष पंतप्रधान केयर स्टारमर यांना शुभेच्छा दिल्या आणि शक्य तितक्या लवकर भारताला भेट देण्याचे आमंत्रणदेखील दिले.

# रिंकू सिंह आणि प्रिया सरोज यांचा साखरपुडा

**लखनऊ, दि. ८ वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज रिंकू सिंह आणि समाजवादी पक्षाच्या खासदार प्रिया सरोज



यांचा साखरपुडा लखनऊमधील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये पार पडला. या भव्य कार्यक्रमाला ३०० पेक्षा अधिक पाहुण्यांची उपस्थिती होती.

रिंकू आणि प्रिया यांच्या या "हाय प्रोफाइल" रिंग सेरेमनीला त्यांच्या कुटुंबियांसह समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, डिंपल यादव, ज्येष्ठ अभिनेत्री आणि खासदार जया बच्चन, इकरा हसन, रामगोपाल यादव यांच्यासह अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. या दोघांच्या विवाहाची तारीख १८ नोव्हेंबर रोजी निश्चित करण्यात आली आहे.

प्रिया सरोज या मूळच्या वाराणसीच्या असून सध्या मच्छलीशहर लोकसभा मतदारसंघातून खासदार आहेत. त्यांचे वडील तूफानी सरोज हे सध्या समाजवादी पक्षाचे आमदार असून ते यापूर्वी तीन वेळा लोकसभेचे खासदार राहिले आहेत.

साखरपुड्याच्या सोहळ्यात ज्या क्षणी रिंकूने प्रियाच्या हातात अंगठी घातली, त्या क्षणी प्रिया भावूक झाल्या. हा क्षण प्रत्येक मुलीच्या आयुष्यातील अतिशय खास असतो. आनंदाच्या भरभरून आलेल्या अश्रूंना त्यांनी टिश्यूने अलगद पुसले. अंगठी एक्सचेंज झाल्यानंतर दोघंही अतिशय आनंदी दिसत होते. या प्रसंगी हॉलमधील वातावरण टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले.

साखरपुड्यापूर्वी पाहुणे हॉटेलमध्ये पोहोचले होते आणि रिंकू व प्रियाही सेरेमनीसाठी सज्ज झाले होते. रिंकूने पांढऱ्या रंगाची शेरवानी परिधान केली होती तर प्रिया गुलाबी रंगाच्या लहंग्यात अत्यंत सुंदर दिसत होत्या. स्टेजवर जाताना रिंकू आणि प्रिया हातात हात घालून एकत्र चालताना दिसले.

# कर्नाटक सरकारने भरपाईची वाढवली रक्कम

**बंगळुरू, दि. ८ वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयानंतर बंगळुरूमधील एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये झालेल्या दुःखद घटनेनंतर कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी मोठी घोषणा केली आहे. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर आरसीबीच्या विजयाचे सेलीब्रेशन सुरु असताना झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला होता तर ६० जण जखमी झाले होते. त्यानंतर आता चेंगराचेंगरीच्या घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना २५ लाख रुपयांची भरपाई रक्कम देण्याचे आदेश मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी दिले आहेत. यापूर्वी पीडितांना १० लाख रुपये देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र आता रकमेत वाढ करण्यात आली आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शनिवारी बंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना जाहीर केलेली भरपाईची रक्कम १० लाख रुपयांवरून २५ लाख रुपये वाढवली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी ही रक्कम वाढवण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी अधिकाऱ्यांना हे नुकसान भरपाई लवकरात लवकर देण्याचे निर्देश दिले आहेत जेणेकरून त्यांना आर्थिक मदत मिळू शकेल.

# ईद-वीकेंडचा पुरेपुर फायदा; 'हाऊसफुल ५'ची दोन दिवसांत जोरदार कमाई

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

सुरुवातीला कासव गतीने जाणारा चित्रपट 'हाऊसफुल ५' ला आता समीक्षकांकडूनही चांगला प्रतिसाद मिळत आहेत. चित्रपट प्रदर्शित होऊन दोन दिवस झाल्यानंतर शनिवारी 'हाऊसफुल ५' चे कमाईचे आकडे समोर आले आहेत. ईदच्या सुट्टी दिनी चित्रपटाला चांगला फायदा झाला.

या चित्रपटात बॉलिवूड कलाकार अक्षय कुमार, अभिषेक बच्चन आणि रितेश देशमुख यांच्या मुख्य भूमिका आहेत. 'हाऊसफुल ५' चित्रपट ६ जून रोजी थिएटरमध्ये रिलीज झाला.



'हाऊसफुल ५' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर पहिल्या दिवशी बऱ्यापैकी ओपनिंग केली. दुसऱ्या दिवशी, ईदची सुट्टी आणि वीकेंडचा फायदा मिळाला. दुसऱ्या दिवशी चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली. 'हाऊसफुल ५' ने पहिल्या दिवशी २४ कोटींची कमाई केली. दुसऱ्या दिवशी 'हाऊसफुल ५' ने देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर ३० कोटी रुपये कलेक्शन केले. आता हे एकूण कलेक्शन ५४ कोटी रुपये झाले आहे. आज संपूर्ण दिवस कमाईतत आणखी वाढ होईल.

'हाऊसफुल ५' मध्ये अक्षय कुमार, रितेश देशमुख आणि अभिषेक बच्चन व्यतिरिक्त संजय दत्त, जॅकी श्रॉफ, नाना पाटेकर, जॅकलिन फर्नांडिस, सोनम बाजवा, सौंदर्या शर्मा, चित्रांगदा सिंग, दिनो मोरिया आणि नर्गिस फाखरी हे कलाकार आहेत.

महासागर PALGHAR
RNI No.: MAHAMAR/2014/62313
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 208/B, Lokmanya Building, Near Taluka Panchayat Samiti Office, Palghar(W)-401404, **Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK, Executive Editor- Shashi Karpe**

महासागर पालघर
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून २०८/बी, लोकमान्य बिल्डिंग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर पालघर (प.) ४०१४०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक : **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) कार्यकारी संपादक - शशी करपे (मो.नं. ९८९२९६८७२५) Email : mumbaimahasagar@gmail.com**
RNI No.: MAHAMAR/2014/62313